cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–२७० बुधवार दि.२८ जानेवारी २०२६ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### सोशल मिडियाचा धोका टाळण्यासाठी चौकट आवश्यक

सध्या इंटरनेट आणि सोशल मीडियाचा वापर तुफान वाढला आहे, लहान मुलेदेखील सोशल मीडियाचा सर्रास वापर करत असल्यामुळे त्यांच्यासमोर नको त्या गोष्टी येत आहेत. अनेकदा यातून गुन्हेगारी प्रवृत्तीचा कंटेंट देखील पाहिला जातो आणि त्याचा या लहान मुलांच्या मनावर परिणाम होतो. याबाबत आंध्र प्रदेश सरकारने मोठा निर्णय घेतला आहे.

# किसान लाँग मार्च मुंबईच्या दिशेने!

## राज्य शासनासोबतची चर्चा निष्फळ ठरल्याने निघाला मोर्चा ; मंत्रालयाला घालणार घेराव

पुणे । प्रतिनिधी

**आदिवासी, शेतमजूर आणि शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर तोडगा न निघाल्याने माकप आणि किसान सभेच्या नेतृत्वाखालील लाँग मार्च मंगळवारी (दि.२७) कसारा घाट ओलांडून ठाणे जिल्ह्यात पोहोचला. मुख्य प्रवाहातील माध्यमे आणि सोशल मीडियावर या लाँग मार्चला मिळणाऱ्या व्यापक प्रसिद्धीमुळे सरकारवर दबाव वाढला आहे. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मंगळवारी मुंबईतील मंत्रालयात शेतकरी शिष्टमंडळाला चर्चेसाठी बोलावले होते. मात्र ही चर्चा निष्फळ ठरल्याचे शेतकरी नेते डॉ. अजित नवले यांनी सांगितले.**




माकप आणि किसान सभेच्या नेतृत्वाखाली नाशिकहून निघालेला हजारो शेतकऱ्यांचा लाँग मार्च ठाणे जिल्हात पोहोचला आहे. आदिवासी, शेतकरी, महिला–पुरुष मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले आहेत. शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर शासनाकडून शिष्टमंडळाला आश्वासक तोडगा न निघाल्याने मुंबईत मंत्रालय आणि राज्य सचिवालयाला घेराव घालण्याचा इशाराही आंदोलकांनी दिला आहे. हा लाँग मार्च ३ फेब्रुवारी रोजी मुंबईत ▶▶ पान २ वर

### शिष्टमंडळासोबत चर्चा निष्फळ

मुख्य प्रवाहातील माध्यमे आणि सोशल मीडियावर या लाँग मार्चला मिळणाऱ्या व्यापक प्रसिद्धीमुळे सरकारवर दबाव वाढला आहे. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मंगळवारी मुंबईतील मंत्रालयात शेतकरी शिष्टमंडळाला चर्चेसाठी बोलावले होते. मात्र ही चर्चा निष्फळ ठरल्याचे शेतकरी नेते डॉ. अजित नवले यांनी सांगितले. या शिष्टमंडळात डॉ. अशोक ढवळे, माजी आमदार जे. पी. गावीत, आमदार विनोद निकोले, उमेश देशमुख, सुभाष चौधरी, इंद्रजित गावीत, इरफान शेख यांच्यासह अनेक नेत्यांचा समावेश होता. तसेच या आंदोलनात दिंडोरी, सुरगाणा, कळवण, चांदवड, पेठ, त्र्यंबकेश्वर आणि इगतपुरी या आदिवासीबहुल भागांतून शेतकरी मोठ्या संख्येने उतरले आहेत.

### आंदोलकांच्या मागण्या

वनाधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, आदिवासींना वनजमिनींचे कायदेशीर हक्क, गायरान व वनजमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना सातबारा उतारे, नदीजोड प्रकल्प, स्थानिक भागात पाणी उपलब्ध करून देणे, शिक्षणाचे खासगीकरण थांबवणे आणि शेतीमालाला किमान आधारभूत किंमत देणे, अशा प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या आहेत. आता या मागण्यांवर सरकार तोडगा काढते की शेतकरी आंदोलन आणखी तीव्र होते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## जि.प. निवडणुकानंतर सातारा गॅझेट लागू होणार!

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा शासन निर्णय घेण्यात आला. त्यामुळे, हैदराबाद गॅझेटियरच्या निर्णयानुसार मराठवाड्यातील अनेक मराठा बांधवांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ मिळण्यासही सुरुवात झाली आहे. त्यामुळे, हैदराबाद गॅझेटियर लागू झाले पण सातारा गॅझेटियर कधी लागू होणार? असा प्रश्न मराठा बांधवांना पडला आहे. मराठा आरक्षण उपसमितीची मंगळवारी मंत्रालयात




बैठक संपन्न झाली. उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वात या बैठकीत सातारा गॅझेटियरवर प्रामुख्याने चर्चा झाली. जिल्हा परिषद निवडणुकीनंतर यावर निर्णय होण्याची शक्यता आहे.

सातारा गॅझेटियरचा लाभ साताऱ्यासह पश्चिम महाराष्ट्रातील मराठा बांधवांना होणार असल्याने या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तसेच, हैदराबाद गॅझेटियर अंमलबजावणी आणि मराठा आरक्षण विषयावर आढावा घेण्यात आला. त्यानुसार, राज्यातील जिल्हा परिषद निवडणुकांनंतर सातारा गॅझेटियर लागू करण्यात येणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. जिल्हा परिषद निवडणुकीनंतर सातारा गॅजेट लागू करण्यासंदर्भात निर्णय होण्याची शक्यता असल्याची ▶▶ पान २ वर

## शासकीय जमिनींच्या भाडेपट्ट्यांचा कालावधी वाढविणार–मंत्रिमंडळ

मुंबई । प्रतिनिधी

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मगळवारी (२७ जानेवारी) राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. यावेळी महसूल, पायाभूत सुविधा, कौशल्य विकास आणि उद्योग क्षेत्राशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. शासकीय जमिनींच्या भाडेपट्ट्यांचा कालावधी वाढवणे, मेट्रो लाईन ८ प्रकल्पाला मान्यता देण्यात आली आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये 'पीएम सेतू' योजना राबवण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.**

वेगवेगळ्या कारणांसाठी भाडेपट्ट्याने देण्यात येणाऱ्या शासकीय जमिनींचा कालावधी वाढवण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. विशेषतः ३० वर्षांसाठी भाडेपट्ट्याने



देण्यात येणाऱ्या जमिनींसाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील तरतुदींनुसार हा कालावधी वाढवला जाणार आहे. तसेच, केंद्र सरकार किंवा राज्य शासनाच्या ताब्यातील शत्रू संपत्तीच्या विक्री–खरेदीसाठी मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. ▶▶ पान २ वर

## ढगाळ हवामानामुळे थंडी ओसरली

### १३ जिल्ह्यांमध्ये पावसाचा अदाज

पुणे । प्रतिनिधी

**राज्यात पावसाळी वातावरणामुळे किमान तापमानात चांगलीच वाढ झाली आहे. त्यामुळे उकाडाही वाढला आहे. राज्यातील काही भागात ढगाळ हवामानासह हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.**

दोन दिवसांपासून राज्यातील काही भागात ढगाळ हवामान होते. त्यामुळे किमान तापमानात वाढ झाली आहे. राज्यातील सर्वच भागात ▶▶ पान २ वर

## मतदानापूर्वीच महायुतीचे २२ उमेदवार बिनविरोध

### झेडपी अन् पंचायत समितीतही महापालिकेचा पॅटर्न

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस संपल्याने, १५ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितीच्या निवडणुकांमधील अंतिम लढतीचे चित्र स्पष्ट झाले आहे. आता प्रचाराचा धुरळा उडणार आहे. मात्र, तत्पूर्वीच काहींनी विजयाचा गुलाल उधळला. त्यामध्ये, कोकण अग्रेसर राहिला असून, कोकणात महायुतीने विजयी खाते उघडले आहे. तळकोकणात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकी आधीच महायुतीचे तब्बल २१ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यात, रायगड जिल्ह्याच्या महाड पंचायत समिती निवडणुकीत सवाने धामणे गणातून उभे असलेले अनिल जाधव बिनविरोध आल्याने महायुतीचे एकूण २२ उमेदवार बिनविरोध झाले आहेत. त्यामुळे, सिंधुदुर्ग आणि रायगडमध्येही महायुतीने विजयाचा आनंद साजरा केला.

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत भाजपने १९ तर शिंदे सेनेने २ उमेदवार बिनविरोध ▶▶ पान २ वर

## महाजनांविरोधात ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करणार - प्रकाश आंबेडकर

नाशिक । प्रतिनिधी

देशाचा ७७ वा प्रजासत्ताक दिन (२६ जानेवारी) देशभर साजरा करण्यात आला. मंत्री गिरीश महाजन यांनी नाशिक येथील पोलिस संचलन मैदान येथे ध्वजारोहण केले. मात्र त्यानंतर गिरीश महाजन यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख टाळला. त्यावरून आता वाद होताना दिसत आहे. या कार्यक्रमावेळी उपस्थित



असलेल्या वनविभागाच्या अधिकारी माधवी जाधव यांनी थेट व्यासपीठावर जाऊन गिरीश महाजन यांना जाब विचारण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आता हे प्रकरण अधिकच तापले आहे. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश महाजन यांनी गिरीश महाजन यांच्याविरोधात ऍट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी माधवी जाधव यांच्यासोबत फोनवरून ▶▶ पान २ वर

## लाडक्या बहिणींच्या केवायसीच्या दुरुस्तीला सुरुवात !

मुंबई । प्रतिनिधी

लाडकी बहिण योजनेच्या ई–केवायसीमध्ये चुकीची माहिती भरल्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून हजारो लाडक्या बहिणींना १५०० रूपयांचा हफ्ता मिळालेला नाही. अशा अपात्र ठरलेल्या लाभार्थी महिलांना आता पुन्हा 'ई–केवायसी'मध्ये दुरुस्ती करता येणार आहे.

ई–केवायसीतील चुकीच्या माहितीमुळे ज्या लाभार्थी महिलांना पैसे मिळत नाहीत त्यांच्याकडून पुन्हा अर्ज मागवण्यात आले आहेत. मंगळवार (दि. २७) पासून ३१ जानेवारीपर्यंत अंगणवाडी सेविकांकडे त्यांचा अर्ज आणि इतर कागदपत्रे जमा करावी लागणार आहेत. ई–केवायसी करताना कॉलम चुकीचा भरल्यामुळे लाभ थांबल्याची माहिती समोर आली होती. आता ज्या महिलांचे पुन्हा अर्ज प्राप्त होतील त्याचे प्रशासनाकडून क्रॉस व्हेरिफिकेशन करून चुका दुरुस्त केल्या जाणार आहेत. ▶▶ पान २ वर

## कडधान्यांची हमीभावाने १०० टक्के खरेदी होणार –कृषिमंत्री चौहान

दिल्ली । वृत्तसंस्था

शेतकऱ्यांच्या शेतमालास योग्य भाव मिळावा यासाठी तूर, मसूर आणि उडीद यांसह सर्व कडधान्यांची किमान आधारभूत किमतीत १०० टक्के खरेदीची खात्री देण्यासाठी केंद्र सरकार काम करत आहे, असे केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटले आहे. नवी दिल्लीत ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सरकारकडून विशेष ▶▶ पान २ वर

### वैज्ञानिक संशोधनाला गती

विकसित कृषी संकल्प अभियानाच्या माध्यमातून शेतीतील वैज्ञानिक संशोधनाला गती देण्यात आली आहे. आयसीएआरची पथके पिकांवरील रोग प्रादुर्भावाची माहिती, काढणीपश्चात होणारे नुकसान आणि नाशवंत शेतमालाचा टिकाऊ कालावधी वाढवण्यासाठी काम करत असल्याची माहिती त्यांनी दिली.

## व्हीआयपी कोण हे जिल्हाधिकाऱ्यांनी ठरवावे

### महाकालेश्वर मंदिरातील दर्शनावरून न्यायालयाने सुनावले

नागपूर । प्रतिनिधी

**उज्जैन येथील श्री महाकालेश्वर मंदिरातील गर्भगृहात 'व्हीआयपी दर्शन' देण्याच्या प्रथेला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. आर. महादेवन आणि न्या. जॉयमल्या बागची यांच्या खंडपीठासमोर दर्पण अवस्थी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी झाली. जिल्हाधिकारी आणि व्यवस्थापन समितीच्या प्रशासकांच्या परवानगीने व्हीआयपींना गर्भगृहात प्रवेश दिला जाऊ शकतो. कोणाला 'व्हीआयपी' मानायचे, हा निर्णय जिल्हाधिकारी व प्रशासकांचा असून तो न्यायालयीन पुनरावलोकनाच्या कक्षेत येत नाही, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले.**

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याची याचिका फेटाळल्याच्या निर्णयाला अवस्थी यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मंदिराच्या गर्भगृहात पाणी अर्पण करण्यासाठी व्हीआयपींना प्राधान्य दिले जाते, तर सामान्य भाविकांना त्यापासून वंचित ठेवले जाते, असा याचिकाकर्त्याचा दावा होता. ▶▶ पान २ वर



### व्हीआयपी ठरविणे न्यायालयाचे काम नाही

महाकालेश्वर मंदिर व्यवस्थापन समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांनुसार गर्भगृहात प्रवेशावर कोणतीही ठोस बंदी नाही. जिल्हाधिकारी आणि व्यवस्थापन समितीच्या प्रशासकांच्या परवानगीने व्हीआयपींना गर्भगृहात प्रवेश दिला जाऊ शकतो. कोणाला 'व्हीआयपी' मानायचे, हा निर्णय जिल्हाधिकारी व प्रशासकांचा असून तो न्यायालयीन पुनरावलोकनाच्या कक्षेत येत नाही, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. ''एखाद्या विशिष्ट दिवशी, व्यक्तीच्या दर्जाचा विचार करून जिल्हाधिकारी त्याला व्हीआयपी मानू शकतात. हे ठरवणे न्यायालयाचे काम नाही असे उच्च न्यायालयाने नमूद केले.

## थोडक्यात...

### शाळकरी मुलींना विहिरीत ढकलले; दोघींचाही मृत्यू

जळगाव : जळगाव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यातून एक अत्यंत हृदयद्रावक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. साकरी गावाजवळ एका माथेफिरूने इयत्ता ९ वीत शिकणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींना विहिरीत ढकलून दिल्याने त्यांचा बुडून मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून जनमानसात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, साकरी गावातील या दोन्ही मुली नेहमीप्रमाणे मंगळवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास घराबाहेर पडल्या होत्या. त्या दोघी गावातीलच एका खासगी शिकवणीला (ट्यूशन) जात होत्या. मात्र, त्यांच्यावर काळाने झडप घातली. गावाबाहेरील एका शेतात रोहन चौधरी नावाचा तरुण दबा धरून बसला होता. या मुली रस्त्याने जात असताना त्याने अचानक त्यांच्यावर हल्ला केला. काहीही समजण्याच्या आत त्याने दोन्ही मुलींना बळजबरीने ओढत नेऊन जवळच असलेल्या एका खोल विहिरीत ढकलून दिले.

### घातक निपाह व्हायरसचा देशात शिरकाव !

नवी दिल्ली : भारतावर आणखी एक नवे संकट ओढवले आहे. खतरनाक निपाह व्हायरसने भारतात एंन्ट्री केली आहे. पश्चिम बंगालमध्ये निपाह विषाणूचे दोन रुग्ण आढळले आहेत. या दोन्ही रुग्णांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली आहे. केंद्र सरकारने या घटनेची दखल घेत राष्ट्रीय संयुक्त उद्रेक प्रतिसाद पथक बंगालमध्ये पाठवले आहे. बंगालमध्ये रुग्ण आढळल्यानंतर आता इतर राज्यांमध्येही या विषाणूचा धोका वाढला आहे. हा विषाणू नेमका काय आहे? तो किती घातक आहे? याची लक्षणे काय आहेत याबाबत जाणून घेण्यात येत आहेत. लेडी हार्डिंग हॉस्पिटलमधील औषध विभागातील डॉ. घोटेकर यांनी निपाह विषाणूबद्दल माहिती दिली आहे. डॉ. घोटेकर म्हणाले की, हा विषाणू प्रामुख्याने फळे खाणाऱ्या वटवाघळांमध्ये आढळतो आणि तेथून मानवांमध्ये किंवा प्राण्यांमध्ये पसरतो. संक्रमित वटवाघूळाने खालेले फळ जर एखाद्या व्यक्तीने खाल्ले तर हा विषाणू मानवांमध्ये पसरतो. एकदा संसर्ग झाल्यानंतर हा विषाणू दुस–या व्यक्तीमध्ये संक्रमित होतो. अशाप्रकारे याचा प्रसार होतो.

### हिरव्या, भगव्या रंगावरून राजकीय स्वार्थ साधण्याचा डाव

मुंबई: तिरंगा देशाची आन, बान आणि शान आहे, तिरंग्यासाठी अनेकांनी आपले रक्त सांडले आहे पण सध्या काही जातीवादी व धर्मांध शक्ती आपल्या स्वार्थी राजकारणासाठी हिरव्या व भगव्या रंगाचे राजकारण करून सामाजिक सलोखा बिघडवण्याचे काम करत आहेत. काँग्रेस कार्यकर्त्यांनी व संविधानवादी लोकांनी मात्र भारतासह संपूर्ण महाराष्ट्रात मनामनात, घराघरात तिरंगा पोहोचवण्याचा संकल्प करावा, असे आवाहन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले. काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करून उत्साहात संपन्न झाला. यावेळी सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस प्रफुल्ल गुडदे पाटील, प्रदेश उपाध्यक्ष राजेश शर्मा, प्रदेश सरचिटणीस जोजो थॉमस, झिशान अहमद, श्रुती म्हात्रे यांच्यासह काँग्रेस सेवादलाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### केदारनाथ–बद्रीनाथमध्येही गैर–हिंदूंना बंदी?

डेहराडूनः हरिद्वारमधील कुंभ क्षेत्रातील १०५ घाटांवर गैर–हिंदूंच्या प्रवेशावर निर्बंध घालण्याच्या प्रस्तावानंतर आता बद्रीनाथ – केदारनाथ मंदिर समिती देखील आपल्या अखत्यारीतील मंदिरांबाबत असाच निर्णय घेण्याच्या विचारात आहे. या समितीकडे बद्रीनाथ, केदारनाथ आणि इतर ४७ मंदिरांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, हा प्रस्ताव लवकरच समितीच्या बोर्डासमोर ठेवला जाण्याची शक्यता आहे. बद्रीनाथ केदारनाथ मंदिर समितीचे अध्यक्ष हेमंत द्विवेदी यांनी सांगितले की, प्रस्तावित निर्बंध हे दीर्घकालीन परंपरेवर आधारित आहेत. ही परंपरा आदि शंकराचार्यांच्या काळापासून पाळली जात आहे. धार्मिक परंपरांचे जतन करण्यात आम्हाला काहीही गैर वाटत नाही. ऐतिहासिकदृष्ट्या या पवित्र धामांमध्ये गैर–हिंदूंचा प्रवेश मर्यादितच राहिला आहे, असे द्विवेदी म्हणाले.

### लाडकीच्या खात्यात २१०० येणार–एकनाथ शिंदे

मुंबई : राज्यातील पात्र महिलांच्या खात्यात प्रति महिना १५०० रुपयांचे मानधन जमा केले जाते. या योजनेअंतर्गत लाडकीच्या खात्यावर २१०० रुपये देऊ, असे आश्वासन सरकारकडून देण्यात आले आहे. लाडक्या बहिणींचे २१०० रुपये करणार असे आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिले आहे. मी जे बोलतो ते करून दाखवतो असेही ते म्हणाले. महायुतीने विधानसभा निवडणुकीआधी लाडकी बहिणींना २१०० रुपये देण्याची घोषणा केली होती मात्र अजूनही ती पूर्ण केलेली नाही. मात्र आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या तोंडावर एकनाथ शिंदेंनी लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचा शब्द दिला आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२.५० क्विंटल | २,६१० | ३,८३० | ३,१८० |
| ज्वारी/हायब्रिड : ४२.०० क्विंटल | १,७०० | ४,००१ | ३,३९६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १३६.५० क्विंटल | ४,४४१ | ७,८५१ | ७,३९१ |
| उडीद : ४.५० क्विंटल | ४,८५० | ६,३०० | ५,५७५ |
| बाजरी: २८.०० क्विंटल | २,१५१ | ३,२६१ | २,७५४ |
| मुग:०.५० क्विंटल | ६,००१ | ६,००१ | ६,००१ |
| सोयाबीन: १८४.०० क्विंटल | ४,९०० | ५,३०० | ५,१७१ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,००० | ६,७०० | ६,१३३ |

cmyk

अग्रलेख

# सोशल मिडियाचा धोका टाळण्यासाठी चौकट आवश्यक

सध्या इंटरनेट आणि सोशल मीडियाचा वापर तुफान वाढला आहे, लहान मुलेदेखील सोशल मीडियाचा सर्रास वापर करत असल्यामुळे त्यांच्यासमोर नको त्या गोष्टी येत आहेत. अनेकदा यातून गुन्हेगारी प्रवृत्तीचा कंटेंट देखील पाहिला जातो आणि त्याचा या लहान मुलांच्या मनावर परिणाम होतो. याबाबत आंध्र प्रदेश सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सोशल मीडियाचा नकारात्मक प्रभाव टाळण्यासाठी आंध्र प्रदेश सरकार १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडियावर बंदी घालण्यासंबंधी विचार करत आहे. यासंबंधी आंध्र प्रदेशचे मंत्री नारा लोकेश म्हणाले, आंध्र प्रदेश सरकार १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याचा विचार करत आहे, ही बंदी ऑस्ट्रेलियात लावण्यात आलेल्या बंदीप्रमाणे असेल. बंदी निर्णयासंबंधी ते म्हणाले, विशिष्ट वयाखालील तरुणांनी अशा प्लॅटफॉर्मवर असू नये, कारण त्यांना कोणत्या कंटेंटचा सामना करावा लागेल ते सांगता येत नाही. हा धोका टाळण्यासाठी अथवा त्याला आळा घालण्यासाठी एक मजबूत कायदेशीर चौकट आवश्यक आहे.

विशिष्ट वयाखालील मुले ऑनलाईन उपलब्ध असलेल्या हानीकारक सामग्रीला समजून घेण्याइतपत भावनिकदृष्ट्या प्रौढ नसतात. म्हणूनच आंध्र प्रदेश सरकार जागतिक सर्वोत्तम पद्धतीचा अभ्यास करत आहे आणि ऑस्ट्रेलियाच्या १६ वर्षांखालील सोशल मीडिया कायद्याचे परीक्षण करत आहे. वायएसआर काँग्रेस पक्षाच्या राजवटीत महिलांवर क्रूर आणि अपमानास्पद हल्ले करण्यासाठी सोशल मीडियाचा उघडपणे गैरवापर करण्यात आला होता. सोशल मीडियावर अनेकवेळा अशा गोष्टी येतात की ज्या लहान मुलांच्या मानसिक आणि भावनिक आरोग्यास हानिकारक असतात. भारतातील लहान मुलांमध्ये स्मार्ट फोन आणि सोशल मीडियाचा वापर झपाट्याने वाढत असून त्याचे गंभीर परिणाम समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर आंध्र प्रदेश सरकारने अत्यंत धाडसी पाऊल उचलण्याचे संकेत दिले आहेत. राज्यातील १६ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर पूर्णपणे बंदी घालण्याबाबत सरकार गंभीरपणे विचारमंथन करत आहे. स्वित्झर्लंडमधील दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीदरम्यान राज्याचे आयटी मंत्री नारा लोकेश यांनी ही माहिती दिली. ब्लूमबर्गला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी स्पष्ट केले की, अल्पवयीन मुलांना सोशल मीडियावरील अनियंत्रित आणि अनेकदा हानिकारक असलेल्या मजकुराचे गांभीर्य समजत नाही. या प्लॅटफॉर्मवर विशिष्ट वयाखालील मुले नसावीत, कारण त्यांना कोणत्या प्रकारच्या कंटेंटचा सामना करावा लागेल याचे योग्य मूल्यमापन ते करू शकत नाहीत. त्यांच्या मानसिक आणि भावनिक विकासासाठी हे अत्यंत धोक्याचे आहे. काही महिन्यांपूर्वी ऑस्ट्रेलियाने १६ वर्षांखालील मुलांसाठी फेसबुक, इन्स्टाग्राम, टिकटॉक, यूट्यूब आणि स्नॅपचॅट यासारख्या प्लॅटफॉर्मवर बंदी घालून जगाचे लक्ष वेधून घेतले होते. ऑस्ट्रेलियाच्या या निर्णयाचे सर्वत्र स्वागत झाले. आता आंध्र प्रदे-श सरकारसुद्धा याच मॉडेलचा सखोल अभ्यास करत आहे. या प्रस्तावांतर्गत नवीन खाती उघडण्यावर निर्बंध आणण्यासोबतच मुलांची जुनी खाती बंद करण्याची तरतूदही केली जाऊ शकते. सध्या पालक मुलांच्या आग्रहाखातर त्यांच्या हातात स्मार्टफोन सोपवत आहेत. मात्र त्याचे परिणाम चिंताजनक आहेत. सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये नैराश्य आणि एकाग्रतेची कमतरता दिसून येत आहे. लहान मुले सायबर गुन्हेगारी आणि अयोग्य कंटेटला सहज बळी पडू शकतात. मैदानी खेळांऐवजी तासन्तास मोबाईलवर घालवल्याने मुलांच्या शारीरिक आणि भावनिक वाढीवर परिणाम होत आहे. या समस्येचे निराकरण करण्यासाठी केवळ समुपदेशन पुरेसे नसून कडक कायदेशीर चौकटीची गरज आहे. मुलांना डिजिटल जगातील धोक्यांपासून वाचवण्यासाठी ठोस पाऊल उचलणे महत्त्वाचे आहे. आंध्र प्रदेश सरकारने हा निर्णय घेतल्यास, असा कायदा करणारे ते देशातील पहिले राज्य ठरेल. सोशल मीडियाचा अंदाधुंद वापर रोखण्यासाठी सरकारचा हा प्रयत्न पालकांसाठी दिलासादायक ठरेल का हे येणाऱ्या काळातच स्पष्ट होईल. ऑस्ट्रेलियामध्ये १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याचा घेण्यात आलेला ऐतिहासिक निर्णय १० डिसेंबर २०२५ पासून लागू झाला असून जागतिक स्तरावर असा निर्णय घेणारा ऑस्ट्रेलिया हा पहिला देश बनला आहे. सरकारच्या या निर्णयानुसार टिकटॉक, यूट्यूब, फेसबुक, इन्स्टाग्राम, थ्रेडस्, एक्स, स्नॅपचॅट, किक, ट्विच आणि रेडिटसारखे मोठे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म १६ वर्षांखालील मुलांसाठी बंद झाले आहेत. सोशल मीडिया कंपन्यांनीही या निर्णयाचे पालन करण्यास तयार असल्याचे जाहीर केले आहे. एलन मस्कच्या एक्सने सुद्धा या निर्णयाला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. सरकारच्या बंदी निर्णयाची अंतिम यादी भविष्यात बदलली जाऊ शकते. या निर्णयानंतर सोशल मीडिया कंपन्यांना अकाऊंटचे वय तपासण्यासाठी वेगवेगळ्या स्तरावर चाचण्या कराव्या लागणार आहेत. यात प्रोफाईल फोटो, अकाऊंटची जुनी माहिती आणि लहान मुलांच्या कंटेंटवर लक्ष ठेवणे यांचा समावेश असेल. जागतिक पातळीवर हा निर्णय एक अनोखा उपक्रम ठरला आहे. तरुण वर्गाने या निर्णयावर वेगवेगळी मते व्यक्त केली आहेत. काही मुलांना ही बंदी अपमानास्पद वाटते तर काहीजण लवकरच ही बंदी समाप्त होईल अशी आशा बाळगून आहेत. या निर्णयाचे उल्लंघन केल्यास आई-वडिलांना किंवा मुलांना कोणतीही शिक्षा नाही मात्र, कंपन्यांना नियम मोडल्यास भरभक्कम दंड भरावा लागू शकतो. आंध्र प्रदेश सरकारने १६ वर्षांखालील मुलांसाठी समाजमाध्यम वापरावरील बंदीचा प्रस्ताव मांडला असला तरी त्याची अंमलबजावणी करणे अत्यंत गुंतागुंतीचे ठरणार आहे. या संदर्भातील कायद्यासाठी केवळ केंद्र सरकारची परवानगीच नव्हे, तर सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणेही अनिवार्य ठरणार आहे. राज्यात अशा प्रकारच्या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी मित्रपक्ष भाजपचा पाठिंबाही आवश्यक आहे.

# शेत पानंद रस्ते योजनेसाठी निधी उपलब्ध करून देणार-आ.खोतकर

**जालना । प्रतिनिधी**

**जालना तहसीलदार कार्यालय येथे मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते योजना अंतर्गत जालना विधानसभा क्षेत्रीय समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीचे अध्यक्षस्थान विधानसभा क्षेत्रीय समितीचे अध्यक्ष तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी भूषविले. या बैठकीत मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते योजना प्रभावीपणे राबविण्यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांच्या शेतांपर्यंत जाणाऱ्या रस्त्यांचे काम**



**दर्जेदार, टिकाऊ व वेळेत पूर्ण होणे अत्यंत आवश्यक असल्याचे आमदार खोतकर यांनी यावेळी स्पष्ट केले. ही योजना शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असून ग्रामीण विकासासाठी मोलाची ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

आ. खोतकर म्हणाले की, येणाऱ्या आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते योजनेचा विषय मांडून या योजनेसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. तसेच विविध सामाजिक संस्था, उद्योग समूहांच्या माध्यमातून सीएसआर निधी व स्थानिक विकास कार्यक्रम निधी अंतर्गतही अतिरिक्त निधी उपलब्ध करून घेण्याचे प्रयत्न करण्यात येतील. शेतकऱ्यांच्या हितासाठी या योजनेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल, असे त्यांनी ठामपणे सांगितले. बैठकीदरम्यान जालना विधानसभा मतदारसंघातील प्रस्तावित बळीराजा शेत पानंद रस्त्यांचे प्रस्ताव तातडीने तयार करून जिल्हास्तरीय समितीकडे सादर करण्याचे निर्देश आमदार खोतकर यांनी समितीच्या सदस्यांना दिले. नवीन प्रस्तावित रस्ते, निधीचे नियोजन, कामांची गुणवत्ता तसेच अंमलबजावणी याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. या बैठकीस समितीचे सदस्य सचिव तथा उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, तहसीलदार छाया पवार व विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते योजनेमुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मोठा लाभ होणार असून शेतापर्यंत जाण्यासाठी सोयीस्कर व मजबूत रस्ते उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे कृषी उत्पादनाची वाहतूक सुलभ होऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीला चालना मिळणार आहे, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते ध्वजारोहण

**जालना । प्रतिनिधी**

**भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.**



यावेळी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अपर जिल्हा दंडाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, यांच्यासह विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# मनातील आवाज आणि विचारांतून जगण्याची प्रेरणा मिळतें-रमजान मुल्ला

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

अंतरातल्या किंकाळीने बधीर झालो आहे, मला वाटते मी चोखोबा, कबीर झालो आहे.... , फुलामंधी फुल बाई हुंगाव जाईचं, जसं प्रेम गं आईचं....राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण समारंभामध्ये उद्घाटक प्रसिद्ध कवी तथा व्याख्याते श्री. रमजान मुल्ला यांनी प्रतिपादन केले. त्यानी दोन बायकांची हौस होती ग गड्याला, बाईचा जलम जसा गाजराचा वाफा यांसारख्या कवितांचे सादरीकरण करून उपस्थितांना मनातील आवाज आणि विचार ओळखून जीवनात वाटचाल करण्याचा संदेश दिला. प्रमुख पाहुणे धारूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. देविदास वाघमोडे जीवनातील उच्च ध्येय ठेवा, प्रामाणिक प्रयत्न करा. आपले नेतृत्व, चारित्र्य आणि कर्तृत्व विकसित होण्यासाठी स्नेहसंमेलन उपयुक्त ठरते असे सांगितले. अध्यक्षीय समारोपातून महाविद्यालय विकास समितीचे निमंत्रित सदस्य डॉ. राम शिनगारे यांनी वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कला कौशल्यांना संधी मिळते. सर्वांनी आपल्यातील कला कौशल्य ओळखून जीवनात यशस्वी होण्याचे आवाहन याप्रसंगी विद्यार्थ्यांना केले. प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविकातून महाविद्यालयाची वाटचाल व प्रगतीचा आढावा सांगितला. याप्रसंगी प्रसिध्द कवी रमजान मुल्ला यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या वतीने दिला जाणारा आदर्श प्राध्यापक पुरस्कार वरिष्ठ विभागातून डॉ. अनंथा गाडे, विभागातून प्रा. सिद्धेश्वर काळे, कनिष्ठ कर्मचारी श्री. अनंत पंडित यांना देण्यात आला. फेब्रुवारी/मार्च २०२५ बारावी बोर्ड परिक्षेत उत्तीर्ण कला शाखेत प्रथम शेख सादिया फारुख, वाणिज्य शाखेत प्रथम उखंडे शिवकन्या छत्रभुज, वाणिज्य शाखेत प्रथम शेळके सायली एकनाथ तर वरीष्ठ वाणिज्य शाखेत प्रथम व अंकेक्षण विषयात प्रथम पवार आकाश सतिषसिंह, अंकेक्षण विषयात प्रथम जाधव प्रतीक्षा रघुनाथ, वाणिज्य शाखेत औद्येगिक कायदे विषयात प्रथम कामाजी अपूर्वा अलंकार यास तर विज्ञान शाखेत प्रथम चिंचाळकर चैत्राली रघुनाथ, वनस्पतीशास्त्र विषयात प्रथम पठाण नदीम आफरिन शकीलखान, रसायनशास्त्र विषयात प्रथम जाधव वैभव विश्वनाथ, कला शाखेतून हिंदी विषयात प्रथम टापरे विठ्ठल ज्ञानेश्वर या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व रोख रकमेसह पारितोषिक देण्यात आले. बक्षीस वितरण समारंभाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे व उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस मान्यवरांनी पुरस्कार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पाहुण्यांचा परिचय डॉ. अनंथा गाडे यांनी करून

दिला. सूत्रसंचालन तसेच क्रीडा विभाग, सांस्कृतिक विभाग, ग्रंथालय विभाग, कौशल्य विकास केंद्र, बेसिक ऑफ मॅथ्स कोर्स आयोजित विविध स्पर्धा यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पारितोषिके देण्यात आली. या प्रसंगीविचार मंचावर महाविद्यालय विकास समितीचे निमंत्रित सदस्य श्री. इं. ना. जाधव, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रोफेसर डॉ. अशोक लाखे यांनी तर आभार पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे यांनी मानले.

# बीड नगरपालिकेत सावळा गोधळ सुरूच

## एकाच मुलीचे वेगवेगळे जन्मतारखीचे दाखले

**बीड । प्रतिनिधी**

**नगरपालिकेतील कारभाराचा आणखी एक धक्कादायक कारनामा समोर आला असून एकाच मुलीचे दोन वेगवेगळे जन्म प्रमाणपत्र देण्यात आल्याचे उघड झाले आहे विशेष म्हणजे या दोन प्रमाणपत्रांमध्ये केवळ नावच नव्हे तर वडिलांचे नाव आणि जन्मतारखेतही गंभीर फेरफार करण्यात आल्याने जन्ममृत्यू नोंदणी विभागाच्या विश्वासाहत्येवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे नगरपालिकेतून बोगस जन्म प्रमाणपत्र दिले जात असल्याच्या अनेक तक्रारी आहेत आणि अशी चर्चा वेळोवेळी होत आली आहे मात्र याचा आता पुरावासमोर आला असून ज्या मुलीच्या नावात आणि जन्मतारखेत बदल करण्यात आला आहे त्या मुलीच्या वडिलांनी याबाबत जिल्हा प्रशासनाकडे तक्रार केली आहे या तक्रारीनुसार कठोर कारवाई होण्याचे संकेत मिळत असून बीड नगरपालिकेच्या जन्ममृत्यू विभागात खुर्चीला चिटकून बसलेल्या संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांच्या वर आता कठोर कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

सदरील मुलीच्या वडिलांनी केलेल्या तक्रारीनुसार असे समोर आले आहे की नगरपालिकेतील मूळ नोंदीनुसार चैतन्य गणेश शिंदे जन्मतारीख ११ ५ २००७ नोंदणी क्रमांक १३ ५४९ प्रमाणपत्र दिल्याची तारीख १० १० २०२५ अशी नोंद बीड नगरपालिकेच्या अधिकृत रेकॉर्डमध्ये आहे सदर मुलीचा जन्म सरकारी दवाखान्यात झाला असून दवाखान्याचे नोंदीतही हा स्पष्टपणे नमूद आहे मात्र धक्कादायक बाब म्हणजे याच मुलीचे दुसरे जन्म प्रमाणपत्र नगरपालिकेने वेगळ्याच नावाने जारी केले आहे या दुसऱ्या प्रमाणपत्राचेतन्य शेषनारायण सोनवणे जन्मतारीख १५ ५ २००८ आणि ३१ ८ २००८ एकाच प्रमाणपत्रात दोन जन्मतारखा नोंदणी क्रमांक २७ २७ प्रमाणपत्र दिल्याची तारीख २५ ५ २०२४ अशी नोंद आहे एकाच व्यक्तीसाठी दोन वेगवेगळी नावे दोन वेगवेगळे वडील आणि दोन जन्मतारका कशाच्या आधारे नोंदवल्यात आल्या आधीपासून अधिकृत रेकॉर्ड अस्तित्वात असताना रेकॉर्डमध्ये कडाकोड करून दुसरे प्रमाणपत्र कसे देण्यात आले हे प्रश्न आता ऐरणीवर आले आहेत या प्रकरणी मुलीच्या वडिलांनी जिल्हा प्रशासनाकडे तक्रार दाखल केली असून नंतर दिलेला भोग जन्म दाखला तात्काळ रद्द करण्यात यावी अशी ठाम मागणी केली आहे प्रशासनाने चौकशीची प्रक्रिया सुरू केल्याचे सांगितले असले तरी नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे दरम्यान हे एकमेव प्रकरण नसून बीड नगरपालिकेच्या जन्ममृत्यू विभागात आर्थिक देवाण-घेवाण करून नोंदीमध्ये फेरफार होत असल्याच्या अनेक तक्रारी नागरिकांकडून पुढे येत आहेत शालेय प्रवेश जात प्रमाणपत्र आधार पासपोर्ट सारख्या महत्त्वाचा कागदपत्रांचा पाया असलेले जन्म दाखले जर अशा पद्धतीने बदलले जात असतील तर हा प्रकार केवळ निष्काळजीपणा नसून सुसूत्र गैरव्यवहाराचा संशय अधिक बळवत बळावतो आहे या प्रकरणात जबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई होणार का की नेहमीप्रमाणे चौकशीच्या नावाखाली प्रकरण दडपले जाणार याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# पान १ वरून...

## किसान लाँग मार्च

दाखल होणार असल्याने शासनदरबारी हालचाली वाढल्या होत्या. शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आला आहे. किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी सांगितले की, मागच्या वर्षीही आम्ही मोर्चा काढला होता, पण मागण्या पूर्ण झाल्या नाहीत. त्यामुळे पुन्हा पायी चालण्याची वेळ आली आहे. सध्या सुमारे ६० हजार शेतकरी सहभागी असून, ही संख्या पुढील काळात एक लाखांपर्यंत जाऊ शकते. सरकारने मागण्या मान्य केल्या नाहीत तर लोकशाही मार्गाने संघर्ष सुरूच राहील, असा इशाराही त्यांनी दिला.

-----------

## शासकीय जमिनींच्या भाडेपट्ट्यांचा

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये 'पीएम सेतू' योजना राबवण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. पहिल्या टप्प्यात नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे जिल्ह्यातील आयटीआय संस्थांमध्ये ही योजना राबवली जाणार असून, पुढील टप्प्यात राज्यातील अन्य संस्थांचा समावेश केला जाणार आहे. या योजनेमुळे युवकांना रोजगार संधी मिळवणे अधिक सोपे होणार आहे.

**मेट्रो लाईन ८ ला मान्यता**

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या दरम्यान मेट्रो लाईन ८ जोडणीस मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली आहे. या मेट्रो मार्गाची एकूण लांबी ३५ किलोमीटर असून त्यापैकी ९.२५ किलोमीटर भूमिगत तर २४.६३६ किलोमीटर उन्नत मार्ग असेल. एकूण २० स्थानके असतील, त्यात ६ भूमिगत आणि १४ उन्नत स्थानकांचा समावेश आहे. प्रकल्पाअंतर्गत ३०.७ हेक्टर भूसंपादनाची आवश्यकता असून, यासाठी सुमारे ३८८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. संपूर्ण प्रकल्पासाठी एकूण २२ हजार ८६२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याची माहिती देण्यात आली.

-----------

## जि.प. निवडणुकानंतर

सूत्रांची माहिती आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमुळे सातारा गॅझेट लागू करण्यास अडचणी येत आहेत. अशातच, फक्त इंटरप्रिटेशनचा भाग असल्याने यासंदर्भात देखील लवकरच निर्णय होणार असून समज-गैरसमज दूर करत मराठा आरक्षणासंदर्भात सातारा गॅझेट लागू करण्यासंदर्भात हालचाली सुरू झाल्या आहेत. राज्यात गेल्या काही महिन्यांपासून निवडणुकाची रणधुमाळी पाहायला मिळत आहे. आधी नगरपालिका निवडणुका, पुन्हा महापालिका आणि आता जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्रातील जवळपास सर्वच जिल्ह्यात आचारसंहिता लागू असल्याने राज्य सरकारला काही महत्त्वाचे निर्णय किंवा नागरिकांना थेट लाभ होईल, असे निर्णय घेतात येत नाहीत.

-------------

## महाजनांविरोधात ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत

संवाद साधल्याचा व्हीडीओ एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर टाकला आहे. तसेच त्यांनी म्हटले की, नाशिकमध्ये भाजप मंत्री गिरीश महाजन यांच्या नीच मानसिकतेचा जाहीर निषेध करणाऱ्या माधवी जाधव (वनरक्षक) यांच्यासोबत फोनवर बोललो. यावेळी माधवी जाधव यांनी पूर्ण घटनाक्रम मला सांगितला. मंत्री गिरीश महाजन यांचे कृत्य ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत येणारा गुन्हा आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल केला नाही, तर मी स्वत: या संदर्भातील कायदेशीर ड्राफ्ट करून पोलिसांना गुन्हा नोंदवण्यास भाग पाडेल. आरएसएस आणि भाजपाकडून सातत्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केला जातो आहे. भाजप आणि गिरीश महाजन यांच्या कृत्याचा आम्ही जाहीर निषेध करतो, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. नाशिकमध्ये आयोजित प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात मंत्री गिरीश महाजन यांनी भाषण करत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतले नाही. त्यामुळे वनविभागात कार्यरत असलेल्या माधवी जाधव यांनी थेट व्यासपीठावर जाऊन गिरीश महाजन यांना जाब विचारण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे कार्यक्रमाच्या ठिकाणी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र त्याठिकाणी उपस्थित पोलिसांनी माधवी जाधव यांना ताब्यात घेतले. त्यावेळी आक्रमक झालेल्या माधवी जाधव यांनी म्हटले की, मला कामावरून काढून टाका किंवा सस्पेंड करा, परंतु मी हा प्रश्न विचारतच राहणार, असा इशारा दिला.

----------

## मतदानापूर्वीच महायुतीचे २२

निवडून आले आहेत. जिल्हा परिषद मध्ये खारेपाटण जिल्हा परिषद उमेदवार प्राची इस्वालकर, बांदा जिल्हा परिषद उमेदवार प्रमोद कामत, पडेल जिल्हा परिषद उमेदवार सुयोगी घाडी, बापर्डे जिल्हा परिषद उमेदवार अवनी तेली, कोळपे जिल्हा परिषद उमेदवार प्रमोद रावराणे, किंजवडे जिल्हा परिषद उमेदवार सावी लोके या भाजपकडून बिनविरोध झाल्या आहेत. तर, जाणवली जिल्हा परिषद उमेदवार रुहिता तांबे या शिंदेंच्या शिवसेना उमेदवारही बिनविरोध निवडून आल्या आहेत. त्यामुळे, मतदानापूर्वीच या उमेदवारांनी विजयाचा गुलाल उधळला. येथील पंचायत समितीमध्ये बिडवाडी पंचायत समिती संजना राणे, वरवडे पंचायत समिती सोनू सावंत, कोकीसरे पंचायत समिती साधना नकाशे, पडेल पंचायत समिती अंकुश ठूकरूल, नाडण पंचायत समिती गणेश राणे, बापर्डे पंचायत समिती संजना लाड, नाटळ पंचायत समिती सायली कृपाळ, नांदगाव पंचायत समिती हर्षदा वाळके, शिरगाव पंचायत समिती शीतल तावडे, फणसगाव पंचायत समिती समृद्धी चव्हाण, जाणवली पंचायत समिती महेश्वरी चव्हाण, आडवली मालडी पंचायत समिती सीमा परुळेकर, आसोली पंचायत समिती संकेत धुरी हे भाजपचे उमेदवार बिनविरोध झाले आहेत. तर कोळझर पंचायत समितीमध्ये शिंदेंच्या शिवसेनेचे गणेशप्रसाद गवस उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यात उबाठा सेनेच्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने हे उमेदवार बिनविरोध झाले आहेत. दोडामार्ग तालुक्यातील कोलझर पंचायत समिती महायुतीचे उमेदवार गणेशप्रसाद गवस बिनविरोध. ठाकरे शिवसेनेचे प्रवीण परब यांनी माघार घेतल्याने गणेशप्रसाद गवस निवडून आले आहेत. गवस हे शिंदेंच्या शिवसेनेचे दोडामार्ग तालुकाप्रमुख म्हणून काम पाहत असून कोलझर पंचायत समितीमधून ते बिनविरोध निवडून आले आहेत.

-----------

## ढगाळ हवामानामुळे

किमान तापमान १२ अंशाच्या पुढे गेले आहे. मध्य महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रातील वाढ काहीशी अधिक आहे. रत्नागिरी जिल्ह्यात सर्वाधिक ३३.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. राज्यातील अनेक भागात मंगळवार सकाळपासूनच ढगाळ हवामान होते. हवामान विभागाने कोकण, उत्तर महाराष्ट्रसह मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागात पावसाचा अंदाज दिला आहे. कोकणातील ठाणे आणि रायगड, उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदूरबार आणि जळगाव तर मध्य महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा आणि सांगली जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज देण्यात आला. तर ठाणे, नंदूरबार आणि रायगड जिल्ह्यात हलक्या पावसाने हजेरी लावली. राज्यात ढगाळ हवामान आणि पाषक वातावरण असल्याने थंडी कमी झाली आहे. पुढील दोन दिवस राज्यात ढगाळ हवामानाचा अंदाज आहे. त्यामुळे थंडी कमीच राहील. मात्र तापमानात काहीसे चढ उतार दिसू शकतात, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

--------

## कडधान्यांची हमीभावाने १००

आमंत्रित केलेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली. चौहान यांनी म्हटले की, शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. देशातील सुमारे ७० टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे शेती आणि त्यांच्याशी संलग्न व्यवसायांवर अवलंबून आहे. भारताने नुकतेच चीनला मागे टाकत जगातील सर्वाधिक तांदूळ उत्पादक देश म्हणून जगात आघाडी मिळवली. तसेच तांदूळ निर्यातीवरील निर्बंध हटवण्यात आले असून, यामुळे विशेषतः बासमती उत्पादक शेतकऱ्यांच्या तांदळाला चांगला चांगले दर मिळत असल्याचा दावा त्यांनी केला. देशांतर्गत शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने सरकारने कडधान्यांच्या आयातीवर ३० टक्के आयात शुल्कही लागू केले असल्याचे मंत्री चौहान यांनी सांगितले. पंतप्रधान पीक विमा योजना अधिक बळकट केली जात आहे. जंगली प्राण्यांमुळे तसेच शेतात पाणी साचून राहिल्याने होणाऱ्या पीक नुकसानीला विमा संरक्षण देण्याचा विचार सरकार करत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच निर्धारित कालावधीनंतर विमा दाव्यांची रक्कम देण्यास उशीर झाल्यास विमा कंपन्यांना १२ टक्के व्याज द्यावे लागेल, असेही त्यांनी सांगितले. डिजिटल सुधारणांवर भर देताना चौहान म्हणाले की, शेतकऱ्यांना कर्ज, विमा आणि विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा यासाठी फार्मर आयडी हे शेतकऱ्यांचे एक स्वतंत्र ओळखपत्र म्हणून सादर करण्यात आले आहे. उपग्रहाच्या आधारे पीक मूल्यांकनाच्या माध्यमातून कागदपत्रांची प्रक्रिया आणि होणारा विलंब कमी करण्याचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच बनावट बियाणे, खते आणि कीडनाशकांवर कडक कारवाई करण्यात येईल. तर गंभीर उल्लंघन केलेल्या प्रकरणांत तुरुंगवासासह दंडाची रक्कम वाढवून ३० लाख रुपयांपर्यंत करण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले.

-------------

## लाडक्या बहिणींच्या केवायसीच्या

चुका दुरुस्त झाल्यानंतर पुन्हा लाडक्या बहिणींना योजनेचा लाभ मिळणार आहे, असे गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सांगितले.

**ही कामे करावी लागणार**

२७ जानेवारी ते ३१ जानेवारीपर्यंत ई-केवायसी करताना चूक झालेल्या लाडक्या बहिणींनी अंगणवाडी सेविकांशी संपर्क साधावा. लाडक्या बहिणींनी यासाठी एक अर्ज करावा लागणार आहे. त्यासोबत आधार कार्ड झेरॉक्स आणि स्वयंघोषणापत्र अंगणवाडी सेविकांकडे जमा करावे लागेल.

------------

## व्हीआयपी कोण हे

याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. विष्णू शंकर जैन यांनी युक्तिवाद करताना सांगितले की, गर्भगृहात प्रवेशाबाबत एकसमान धोरण असले पाहिजे. ही बाब संविधानाच्या अनुच्छेद १४ चे उल्लंघन आहे. व्हीआयपी दर्जाच्या आधारावर नागरिकांमध्ये भेदभाव करता येणार नाही. एखाद्या व्यक्तीला जिल्हाधिकाऱ्यांच्या शिफारशीवर गर्भगृहात प्रवेश दिला जात असेल, तर सामान्य भाविकालाही महाकालाचे दर्शन घेऊन पाणी अर्पण करण्याचा अधिकार असला पाहिजे असे त्यांनी मांडले. यावेळी सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी महत्वपूर्ण विधान केले. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट केले की, गर्भगृहात कोणाला प्रवेश द्यावा किंवा देऊ नये, हा निर्णय न्यायालयाचा विषय नाही. हा प्रश्न न्यायालयीन हस्तक्षेपाच्या कक्षेत येत नाही. अशा बाबींवर निर्णय घेण्याची जबाबदारी संबंधित प्राधिकरणांची आहे. न्यायालयांनी जर अशा प्रकारचे नियमन सुरू केले, तर ते अतिरेकी ठरेल असे निरीक्षण त्यांनी नोंदवले. तसेच, जर गर्भगृहात अनुच्छेद १४ लागू केला, तर अनुच्छेद १९ सारखे इतर मूलभूत हक्कही लागू करण्याची मागणी होऊ शकते, असेही सरन्यायाधीशांनी नमूद केले. आज प्रवेशाचा हक्क मागितला जाईल, उद्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यांच्या आधारे मंत्रोच्चार करण्याचा हक्कही मागितला जाईल. अशा परिस्थितीत सर्व मूलभूत हक्क गर्भगृहात लागू होतील असे त्यांनी सांगितले. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी पुन्हा भेदभावाचा मुद्दा उपस्थित करत, किंवा सर्वांसाठी पूर्ण बंदी असावी किंवा सर्वांसाठी समान प्रवेश असावा. निवडक आणि प्राधान्याच्या आधारावर परवानगी देणे अयोग्य आहे असा युक्तिवाद केला. मात्र न्यायालय हस्तक्षेप करण्यास तयार नसल्याने याचिका मागे घेण्यात आली.

-----------

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
बुधवार दि. २८ जानेवारी २०२६



# मोहरीच्या उत्पादनात १० टक्के वाढीचा अंदाज

## ईशान्य भारतात मात्र लागवडखालील क्षेत्रात घट

पुणे : देशात मोहरी प्रमुख तेलबिया पिक असून राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, हरियाणा, पंजाब आदी या राज्यांमध्ये मोहरीचे उत्पादन घेतले जाते. देशांतर्गत खाद्यतेलाच्या उत्पादनात मोहरीचा ३० टक्के वाटा आहे. मागील वर्षी मोहरीच्या उत्पादनात ४ टक्क्यांपेक्षा जास्त घट झाली होती. परंतु यंदा मात्र मोहरी पिकासाठी आत्तापर्यंत अनुकूल हवामान असल्याने २०२५-२६ च्या मोहरी उत्पादनात १० टक्के वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या वर्षी मोहरीची लागवड ८९.३६ लाख हेक्टरवर झाली आहे. मागील वर्षी ८६.५७ लाख हेक्टर क्षेत्र लागवडी खाली होते. तसेच देशात मागील वर्षी १२६.६७ लाख टन उत्पादन झाले होते. तर यंदा १३९ लाख टन उत्पादनाचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. सध्या मोहरीचे पिक चांगल्या स्थितीत आहे. परंतु प्रमुख मोहरी उत्पादक राज्यात पंजाब, हरियाणामध्ये हलक्या ते मध्यम सरी हजेरी लावण्याची शक्यता आहे. तर उत्तर प्रदेश आणि राजस्थानमध्य जोरदार वारे वाहण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. त्यामुळे मोहरी पिकाला प्रतिकूल हवामानाचा फटका बसण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. रब्बी पिकांना



दवाचा फटका बसतो. परंतु सध्या दव पडत नसल्याने मोहरी पिकाला पोषक हवामान असल्याचे तज्ञ सांगत आहेत. राजस्थानमध्ये क्षेत्र १ टक्क्यांनी वाढून ३५.३५ लाख हेक्टर झाले आहे. मात्र, हे क्षेत्र अजूनही २०२२-२३ मधील विक्रमी ३९.३७ लाख हेक्टरपेक्षा कमी आहे. मध्य प्रदेशात मोहरीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले असून ते ४१ टक्क्यांनी वाढून ११.७९ लाख हेक्टर झाले आहे. उत्तर प्रदेशात मोहरीचे क्षेत्र ४ टक्क्यांनी वाढून १६.९९ लाख हेक्टर झाले आहे. विशेष म्हणजे, उत्तर प्रदेशमध्ये २०१५-१६ मध्ये हे क्षेत्र फक्त ५.९३ लाख हेक्टर होते, म्हणजेच मोहरी लागवडी खालील क्षेत्र तीनपट वाढ झाली आहे. बनारस हिंदू विद्यापीठाच्या सहकार्याने उत्तर प्रदेशमध्ये मोहरी क्षेत्र विस्तारासाठी एक कार्यक्रम चालवला गेला. त्यामुळे पूर्व उत्तर प्रदेशमध्ये मोहरी क्षेत्र वाढल्याचा जाणकारांचा दावा आहे. ईशान्य भारतात, विशेषतः आसाम आणि झारखंडमध्ये, मोहरीच्या लागवडीखालील क्षेत्रात घट झाली आहे. झारखंडमध्ये नोव्हेंबर महिन्यात पावसाने हजेरी लावली. पेरणीनंतर पाऊस झाला तर पिकाला जास्त तापमान आणि कीडरोगांचा फटका बसतो. झारखंडमध्ये मोहरीचे क्षेत्र २०१५-१६ मध्ये १.९४ लाख हेक्टर होते. २०२४-२५ मध्ये ते वाढून ४.५८ लाख हेक्टर झाले. मात्र यावर्षी ते घटून ३.५२ लाख हेक्टर झाले.

झारखंड राज्य सरकारने मोहरीचे ५.४८ लाख हेक्टर लागवडीचे उद्दिष्ट निश्चित केले होते. परंतु उद्दिष्ट पूर्ण झाले नाही. तर संपूर्ण ईशान्य भारतात मोहरी लागवडीखालील क्षेत्र ३.९७ वरून ३.०४ लाख हेक्टरपर्यंत घसरले असून आसाममध्ये ३.०७ वरून २.८८ लाख हेक्टरपर्यंत क्षेत्रात घट झाली आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६४६ : मराठी राज्याची राजमुद्रा वापरुन लिहीलेले शिवाजीराजांचे पहिले पत्र उपलब्ध
१९४२ : दुसरे महायुद्ध - जपानी फौजांनी शांघाय शहराचा ताबा घेतला.
१९६१ : 'एच. एम. टी. वॉच फॅक्टरी' हा भारतातील पहिला घड्याळांचा कारखाना बंगलोर येथे सुरू झाला.
१९७७ : मिर्झा हमीदुल्ला बेग यांनी भारताचे १५ वे सरन्यायाधीश म्हणून कार्यभार सांभाळला.
१९८६ : चॅलेंजर या अवकाशयानाचा उड्डाणानंतर ७४ सेकंदांनी स्फोट झाला.
२०१० : १९७५ मधे बांगलादेशचे राष्ट्राध्यक्ष शेख मुजीबूर रहमान यांची हत्या करणाऱ्याला फाशी देण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४५७ : हेन्री (सातवा) - इंग्लंडचा राजा (मृत्यू: २१ एप्रिल १५०९)
१८६५ : 'पंजाब केसरी' लाला लजपतराय - स्वातंत्र्यसेनानी (मृत्यू: १७ नोव्हेंबर १९२८)
१८९९ : फील्डमार्शल के. एम. करिअप्पा - स्वतंत्र भारताचे पहिले लष्करप्रमुख (मृत्यू: १५ मे १९९३)
१९२५ : डॉ. राजा रामण्णा शास्त्रज्ञ, अणुऊर्जा आयोगाचे ४ थे अध्यक्ष (मृत्यू: २३ सप्टेंबर २००४)
१९३० : पं. जसराज - मेवाती घराण्याचे शास्त्रीय गायक
१९३७ : सुमन शंकर हेमाडी तथा सुमन कल्याणपूर - चित्रपट व भावगीत गायिका. त्यांनी हिन्दी, मराठी, गुजराथी, बंगाली, पंजाबी, उरिया इ. अनेक भाषांत गाणी गायिली आहेत.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५४७ : हेन्री (आठवा) - इंग्लंडचा राजा (जन्म: २८ जून १४९१)
१६१६ : संत दासोपंत समाधिस्थ (जन्म: २४ सप्टेंबर १५५१)
१८५१ : बाजीराव पेशवे (दुसरे) यांचे कानपूरजवळ ब्रम्हावर्त येथे निधन झाले. (जन्म: १० जानेवारी १७७५)
१९८४ : सोहराब मेहेरबानजी मोदी - चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व अभिनेते, दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित (१९७९), 'मिनर्व्हा मुव्हीटोन'तर्फे त्यांनी चाळीसहून अधिक चित्रपट निर्माण केले. (जन्म: २ नोव्हेंबर १८९७)
१९९६ : बर्न होगार्थ - जंगलचा सम्राट टारझन याला कार्टुनद्वारे अजरामर करणारे अमेरिकन व्यंगचित्रकार, लेखक, शिक्षणतज्ञ (जन्म: २५ डिसेंबर १९११ शिकागो, इलिनॉय, यू. एस. ए.)
१९९७ : डॉ. पांडुरंग वासुदेव तथा पां. वा. सुखात्मे - आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संख्याशास्त्रज्ञ व आहारतज्ञ, पद्मभूषण (१९७१) (जन्म: २७ जुलै १९११)
२००७ : ओंकार प्रसाद तथा ओ. पी. नय्यर - संगीतकार (जन्म: १६ जानेवारी १९२६).

# दुधाळ जनावरांमध्ये कासदाह हा सामान्य पण गंभीर आजार



गाई, म्हशी किंवा इतर दुधाळ जनावरांमध्ये कासदाह हा सर्वात सामान्य पण गंभीर आजार आहे. यामुळे कास सुजते, गरम होते आणि दुधाचे प्रमाण व दर्जा कमी होतो. योग्य काळजी न घेतल्यास दुधाची गुणवत्ता खालावते आणि जनावरांचा त्रास वाढतो. चला पाहूया, कासदाहची लक्षणे, कारणे आणि सोपे उपाय.

कासदाहची लक्षणे : कास सुजणे आणि गरम लागणे,लालसर होणे,कासावर वेदना होणे,दुध कमी येणे किंवा दुध खराब होणे इत्यादी. जर ही लक्षणे दिसली, तर त्वरित लक्ष द्या.

कासदाह होण्याची मुख्य कारणे : जीवाणू संसर्ग,घाणेरडी किंवा आर्द्र जागा,दूध काढण्याच्या चुकीच्या पद्धती,कासेला दुखापत होणे,रोग प्रतिकारशक्ती कमी असणे इत्यादी.

कासदाह टाळण्यासाठी उपाय : गोठ्याची स्वच्छता - गोठा स्वच्छ व कोरडा ठेवा.बसण्याच्या जागी वाळू, राख, लाकडाचा भुसा किंवा चुना वापरा.गाई-म्हशींच्या सडांना जंतुनाशक द्रावणात वेळोवेळी बुडवा. दूध काढण्याची योग्य पद्धत - दूध काढण्याअगोदर हात स्वच्छ धुवा.दूध काढणीयंत्राची स्वच्छता राखा.दूध काढल्यावर जंतुनाशक द्रावणाने निर्जंतुकीकरण करा.आहार व्यवस्थापन : प्रथिने आणि ऊर्जा संतुलित प्रमाणात द्या.शरीराची रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी सेलेनियम, जीवनसत्त्व ई, झिंक व बायोटीनचा समावेश करा.कासदाह झाल्यास त्वरित पशुवैद्यकांचा सल्ला घ्यागोठ्यात नवीन येणाऱ्या गायी, म्हशी जीवाणूंचे वाहक असू शकतात.नवीन जनावर पशुवैद्यकाकडून तपासून घेऊनच गोठ्यात आणा.

# आंबा पिकातील फळगळ टाळण्यासाठी करा हे उपाय

अन्नद्रव्य व्यवस्थापनासाठी शिफारस केलेल्या खतांचा अवलंब करून आंब्याचे उत्पादन वाढविण्यासाठी आम्रशक्ती या विद्राव्य निविष्ठेच्या तीन फवारण्या कराव्यात.

आम्रशक्ती द्रावण तयार करण्यासाठी प्रति १०० लिटर पाण्यात ०.५% (५०० ग्रॅम प्रत्येकी) युरिया, सल्फेट ऑफ पोटॅश व सिंगल सुपर फॉस्फेट अधिक ०.२५% (२५० ग्रॅम प्रत्येकी) झिंक सल्फेट, बोरॅक्स व कॉपर सल्फेट अधिक ०.०९% (९० ग्रॅम) सोडियम मॉलिब्डेट मिसळावे. या फवारण्या अनुक्रमे बोंगे फुटण्याच्या अवस्थेत (मोहोर फुटण्याच्या अवस्थेत), बहरलेल्या मोहोरावर आणि फळे सुपारी ते अंड्याएवढी झाल्यावर कराव्यात. हापूस आंबा पिकामध्ये फळगळ कमी करून उत्पादन वाढविण्यासाठी व साक्याचे प्रमाण कमी करण्यासाठी एन्? ऐटका १० टक्के आणि फॉलिक ॲसिड (०.२० टक्के) घटक असलेल्या द्रावणाची फवारणी अनुक्रमे ५० टक्के मोहर फुलल्यावर (१मिली/लि.), फळे वाटाण्याच्या आकाराची झाल्यावर (१.५ मिली/लि.), फळाचा आकार अंडाकृती झाल्यावर (२) मिली/लि.) करावी. किमान तापमान सातत्याने कमी राहिल्यास, आधीच मोहोर आलेल्या किंवा आधीच फळे धरलेल्या फांद्यांवर पुन्हा नवीन मोहोर येण्याची शक्यता असते. यामुळे अन्नद्रव्यांचा प्रवाह नवीन मोहोराकडे वळून जुन्या मोहोरावरील वाटाणा किंवा गोटी आकाराच्या फळांची गळ होऊ शकते. ही पुन्हा मोहोर येण्याची प्रक्रिया टाळण्यासाठी जिब्रेलिक असिड



(,) ५० पी.पी.एम. (१ ग्रॅम प्रति २० लिटर पाणी) या संजीवकाची फवारणी करण्याची शिफारस करण्यात येते. ही फवारणी झाडावर पुरेसा मोहोर आल्याची खात्री झाल्यानंतरच करावी. जिब्रेलिक ॲसिडची फवारणी मोहोर पूर्ण उमललेला असताना एकदा तसेच फळे मोहरीच्या दाण्याच्या आकाराची झाल्यावर पुन्हा एकदा करावी. जिब्रेलिक ॲसिड पाण्यात अविद्राव्य असल्याने प्रथम ते थोड्या प्रमाणात अल्कोहोलमध्ये विरघळवून नंतर आवश्यक त्या प्रमाणात पाण्यात चांगले मिसळून फवारणी करावी.

आंबा पिकामध्ये मोहोर आल्यानंतर फळे वाटाणा, गोटी व अंडाकृती अवस्थेत असताना १% पोटेशियम नायट्रेट (१० ग्रम प्रति लिटर पाणी) याच्या तीन फवारण्या कराव्यात. पालाश अन्नद्रव्यामुळे फळांचे वजन व आकार वाढण्यास मदत होते तसेच फळांची गुणवत्ता सुधारते. यामुळे साखर व आम्लता यांचे प्रमाण संतुलित राहून फळांच्या सालीसह आतील गराला आकर्षक रंग प्राप्त होतो. याशिवाय फळांचा टिकाऊपणा वाढतो व फळातील साक्याचे प्रमाण कमी होते. दमट हवामानामुळे भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी प्राधान्याने ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि.ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून वापरावे.

# शंभर किलो वजनाची 'दुंबा शेळी' जाणून घ्या वैशिष्ट्ये



शेतीव्यतिरिक्त पशुपालन हा असा एक पर्याय आहे जो शेतकर्यांचे उत्पन्न वाढविण्यास मोठा हातभार लावतो. जाणून घेऊ शेळी पालनामध्ये एका महत्त्वपूर्ण शेळीच्या जातीची माहिती, जिचे नाव आहे दुंबा शेळी आहे.

उत्तर प्रदेशातील अमरोहा जिल्ह्यातील शेतकरी अनेक वर्षांपासून दुंबा शेळीपालन करत आहेत. या माध्यमातून अनेक शेतकरी दरवर्षी लाखो रूपयांची कमाई करतात. या जातीच्या बोकडाला ईदच्या दिवशी खूप मागणी असते. त्याला किंमत देखील चांगली मिळते. त्यामुळे शेळी पालन करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये ती लोकप्रिय आहे. या जातीचा नर देखील तेवढाच शेळी पालकांच्या पसंतीचा असून या जातीच्या शेळीची पिल्ले देखील मोठ्या प्रमाणात विकली जातात.


दुंबा शेळीची वैशिष्ट्ये : दुंबा शेळी नऊ महिने ते एक वर्षाच्या कालावधीत पिल्लांना जन्म देते. एकावेळी एकाच पिल्लाला जन्म देते. सुरुवातीच्या दोन महिन्यात पिल्लांचे वजन २५ किलो होते. या जातीची पिल्ले दिसायला खूप आकर्षक दिसतात व त्यांना चांगली किंमत मिळते. एका वर्षात वर्षाच्या कोकराचे वजन सुमारे शंभर किलो होते असे शेतकरी सांगतात.दुंबा जातीच्या शेळीच्या पिल्लांची किंमत : या जातीच्या शेळ्यांच्या पिल्लांची किंमत दोन महिन्यात तीस हजार रूपयांवर जाते मात्र तीन ते चार महिने होतात त्यांची किंमत ७० ते ७५ हजार रूपयांपर्यंत जाते. या जातीच्या शेळीची किंमत ही नर किंवा मादी या दराने मिळत नसून तिच्या वैशिष्ट्यांवर मिळते. परंतु मादी दुंबाला चांगली किंमत मिळते.

# अशी करा कारल्यांसाठी मंडपाची उभारणी

ेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये कारले हे महत्त्वाचे व कमी कालावधीत येणारी पिके आहे. कमी कालावधीमध्ये जास्त उत्पन्न व नफा मिळवून देणारे म्हणून या पिकाकडे पाहिले जाते. कारले मध्ये अनेक प्रकारचे औषधी गुणधर्म असतात त्यामुळे भारतीय तसेच विदेशी बाजारपेठेत त्याला चांगली मागणी असते.

कारल्या मध्ये जीवनसत्व अ आणि क, प्रोटीन आणि कार्बोहायड्रेट्स तसेच लोह, फॉस्फरस सारखे घटकातील प्रमाणात आहेत. कारल्याची लागवड ही आपल्याकडे पावसाळी म्हणजे जून महिन्यात व उन्हाळी जानेवारी महिन्यात करतात. तसेच आपल्याकडे कारले लागवडीच्या दोन पद्धती आहेत पहिली म्हणजे ताटी पद्धत आणि दुसरी म्हणजे मंडप पद्धत या पद्धतीद्वारे कारल्याच्या वेलीला आधार दिला जातो. या लेखात आपण मंडप पद्धतीविषयी माहिती घेऊ.

आधार देण्यासाठी मंडप उपयुक्त : १) मंडप पद्धतीमध्ये कारल्याची लागवड अडीच बाय १ मीटर अंतरावर करतात. त्यासाठी अडीच मीटर अंतरावर रीजरणे सरी पाडावी. त्यानंतर जमिनीचा उतार कसा असेल त्यानुसार पाणी देण्याच्या



दृष्टीने दर पाच ते सहा मीटर अंतरावर आडवे पाट पाडा व शेत चांगल्या पद्धतीने बांधून घ्यावे. २) मंडपाचे उभारणी करताना शेताच्या सर्व बाजूंनी एक सरी सोडून म्हणजे पाच मीटर अंतरावरदहा फूट रुंदीचे आणि चार इंच जाडीचे लाकडी डांब शेताच्या बाहेरील बाजूस झुकतील अशा पद्धतीने दोन फूट जमिनीत गाडावेत. ३) डांब किंवा लाकडाचे दांडीला जी बाजू जमिनीत गाडनार त्या बाजूला डांबर लावावे जेणेकरून त्या कुजणार नाहीत. प्रत्येक खांबास बाहेरच्या बाजूने दहा गज जाडीच्या तारेने तान द्यावेत. त्यासाठी एक ते दीड फूट लांबीच्या निमुळत्या दगडास दुहेरी तार बांधून तो दगड दोन फूट जमिनीत पक्का गाडावा. ४) नंतर डांब बाहेरील बाजूसओढून ६.५ फूट उंचीवर तानाच्या तारेने पक्का करावा तार खाली घसरू नये म्हणून तारेवर यू आकाराचा खिळा ठोकून तार पक्की करावी. अशारितीने ताण दिल्यानंतर दहा गेजचीदुहेरी तार पीळ देऊन ६.५ फोटो उंचीवर यु आकाराचा खिळा ठोकून त्यात ओवूनपूलावरच्या साह्याने व्यवस्थित ताणून घ्यावी. ५) तसेच चारी बाजूने समोरासमोरील लाकडी डांब एकमेकांना दहा गेजच्या तारेने जोडून घ्यावेत आणि पुलारच्या साह्याने चौरस तयार होईल. त्यानंतर वेलाच्या प्रत्यक्ष सरिवर आठ फूट अंतरावर बांबूने वेलाच्या तारेस आधार द्यावा म्हणजे मंडपास झोळ येणार नाही आणि मंडप वाऱ्याने हलणार नाही.

६) मंडप उभारणीचे काम वेल साधारण एक ते दीड फूट उंचीचे होण्याआधी पूर्ण करणे फार गरजेचे आहे. मंडप तयार झाल्यानंतर साडेसहा ते सात फूट लांबीची सुतळी घेऊन तिचे एक टोक वेलाच्या खोडाजवळ तिरपी काडी रोवून त्या काडीस बांधावे व दुसरे टोक वेलीवरील तारेस बांधावे. वेल त्या सुतळी पीळ देऊन तारेवर चढवावा. ७) वेलींना आधार आणि वळण देणे गरजेचे व फायदेशीर असते. जमिनीत बिया टाकल्यानंतर साधारण आठ ते दहा दिवसात उगवण होते. चांगले वाढ असलेली रोपे ठेवून बाकीचे रोपे काढून टाकावीत. ८) वेलीच्या जवळ एक फुटाच्या लहान काटक्या रोवून घ्यावेत. क्या काट्यांना सुतळी बांधावी व वेलीच्या अगदी बरोबर वरून आडव्या जाणाऱ्या तारेला दोन पदरी सुतळी बांधावे. नंतर बेल जसा वाटेल तसा तसा त्या तणावाच्या साहाय्याने दोरीवर चढत जातो. ९) वेली दोरीचा हेलकाव्याने खाली पडणार नाहीत तसेच शेंडे मोडणार नाही याची काळजी घ्यावी. वेलीच्या पोटी जशा वाढतील तशा मांडवाच्या तारेवर आडव्या पसरवून घ्याव्यात.

बुधवार दि.२८ जानेवारी २०२६ ५

राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत

# प्रजासत्ताक दिनी ना. पंकजाताई मुंडेंनी मांडलं जालन्याच्या विकासाचं व्हिजन

## शासकीय ध्वजारोहण,जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ३५९ कोटी २४ लाखांच्या प्रारूप आराखड्यास मंजुरी

जालना । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जालना जिल्ह्याच्या विकासाचं व्हिजन नियोजन बैठकीतून मांडलं. तत्पूर्वी शासकीय ध्वजारोहण, आढावा बैठक आणि विविध लोकोपयोगी कार्यक्रम, संस्थांना तसेच नागरिकांच्या भेटीमुळे त्यांचा दिवसभराचा शेड्युल अक्षरशः बिजी होता. ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते सकाळी ९.१५ वा. पोलीस परेड ग्राऊंडवर प्रजासत्ताक दिनाचे ध्वजारोहण झाले. पोलिस परेड चे निरिक्षण करत त्यांनी मानवंदना स्विकारली.

ध्वजारोहण कार्यक्रमानंतर पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते विविध लाभार्थ्यांना विविध लाभ व पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये पी.एम.ए.वाय घरकुल लाभार्थ्यांना चावी वाटप. ओबीसी महामंडळ व वसंतराव नाईक महामंडळ अंतर्गत ट्रॅक्टर व आयशर वाटप तसेच






भगवान बाळु नरोडे, पोलीस उप निरीक्षक पोलीस ठाणे अंबड यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक प्रदान करण्यात आले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी मल्लखांब कवायती, नृत्य व विविधी कलागुण सादर केले. अंगणवाडीतील चिमुकल्यांनी सादर केलेल्या शेतकऱ्यांच्या व्यथा ने पालकमंत्री भारावून गेल्या.जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी, प्रगतीसाठी तसेच शासनाच्या सर्व योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी आपण कटिबध्द असल्याचे त्या यावेळी म्हणाल्या. जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या शासकीय योजनांची माहिती देत पुढील महिन्यात होत असलेल्या दहावी व बारावीच्या परिक्षार्थींना त्यांनी शुभेच्छा दिल्या. पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या जिल्हा नियोजन विकास समितीच्या बैठकीत सन २०२६-२७ यावर्षीच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या ३५९ कोटी २४ लाखांच्या प्रारूप आराखडया मंजुरी देण्यात आली. सन २०२५-२६ च्या मंजूर आराखड्यातील १०० टक्के निधी खर्च करण्याचे निर्देश त्यांनी दिले. शासनाने घातलेली मर्यादा व प्रत्यक्ष मागणी यावरून जिल्ह्याचा २०२६-२७ चा नियोजनाचा आराखडा ठरणार आहे. या आराखड्यामध्ये जिल्ह्यातील यंत्रणेने प्रस्तावित केलेल्या मागणीप्रमाणे निधी मिळावा यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीला यावेळी खासदार कल्याण काळे, आमदार सर्वश्री राजेश राठोड, अर्जुन खोतकर, बबनराव लोणीकर, नारायण कुचे, संतोष दानवे, हिकमत उढाण, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

## ध्वजारोहणानंतर काही क्षणांतच अधिकाऱ्याचा मृत्यू

धाराशिव । प्रतिनिधी

देशभरात ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आनंद, उत्साह आणि देशभक्तीचे वातावरण असताना उमरगा येथून एक अत्यंत हृदयद्रावक घटना समोर आली. राष्ट्रध्वजाला मानवंदना देत अभिमानाने उभा असलेला एक अधिकारी काही क्षणांतच काळाच्या पडद्याआड गेला आणि आनंदाच्या क्षणांवर शोककळा पसरली.

उमरगा तालुक्यातील सोलापूर हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सीमा तपासणी नाक्यावर सकाळी साडे सात ते आठच्या दरम्यान प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुय्यम निरीक्षक मोहन भिमा जाधव (वय ५६) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. देशभक्तीच्या घोषणा, अभिमानाने फडकणारा राष्ट्रध्वज आणि आनंदी वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला. अत्यंत उत्साही वातावरणात कार्यक्रम संपल्यानंतर उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांचा एकत्रित फोटो काढला जात होता. मात्र याच वेळी अचानक मोहन जाधव जमिनीवर कोसळले. क्षणातच एकच गोंधळ उडाला. सहकारी कर्मचारी निळकंठ गरड, समाधान कोल्हे, एस जे घोगरे, एस पी मुंजळे, आर बी ठाकूर आदीनी प्रसंगावधान राखत त्यांना तातडीने खासगी वाहनातून उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करून उपचार सुरू असतानाच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेने उपस्थितांवर शोककळा पसरली. त्यांच्या निधनाची बातमी कळताच उपजिल्हा रुग्णालय परिसरात कुटुंबीयांनी आक्रोश केला. एकीकडे राष्ट्रध्वज अभिमानाने फडकत असताना दुसरीकडे एका अधिकाऱ्याची जीवनयात्रा संपल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मोहन जाधव यांनी अवघ्या पाच महिन्यांपूर्वी सोलापूर येथून सहाय्यक दुय्यम निरीक्षक पदावरून पदोन्नती घेत दुय्यम निरीक्षक म्हणून उमरगा येथे पदभार स्वीकारला होता. कर्तव्यनिष्ठ, मनमिळावू आणि सहकाऱ्यांमध्ये आदर असलेला अधिकारी म्हणून त्यांची ओळख होती. तर त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे.

## शेतातील साहित्याची चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

लातूर। प्रतिनिधी

जिल्ह्यात शेतशिवारातील पाणबुडी मोटारी, स्प्रिंकलर सेट, म्हशी तसेच परवाना असलेल्या हॉटेल, बिअर बार फोडून विदेशी दारू चोरी करणाऱ्या संघटित टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. लातूर तालुक्यातील लातूर ते मुरुड जाणाऱ्या रस्त्यावर करकटा पाटी येथील एका बारसमोर संशयितरित्या थांबलेल्या चौघांना ताब्यात घेऊन ९.२६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात स्थापन करण्यात आलेल्या विशेष पोलीस पथकाला मिळालेल्या माहितीनुसार, या पथकाने दि. २४ जानेवारी रोजी दुपारी १४.३० वाजता लातूर ते मुरुड जाणाऱ्या रस्त्यावर करकटा पाटी येथे सापळा रचण्यात आला. येथील बारसमोर पांढऱ्या रंगाच्या बोलेरो पिकअप वाहनासह चार संशयित इसम संशयास्पदरीत्या थांबले होते. त्यांना ताब्यात घेण्यात आले. महादेव उर्फ बापु सुरेश चव्हाण (वय ४५, रा. राजेशनगर, ढोकी, ता. वाशी, जि. धाराशिव), राहुल निवत्ती काळे (वय २३, रा. साठे चौक, धाराशिव), तेजस उर्फ पप्पु भिमराव शिंदे (वय ३५, रा. पिंपळगाव, ता. वाशी), नितीन गजेंद्र काळे (वय ३२, रा. राजेशनगर, ढोकी, ता. वाशी) असे आरोपींचे नाव आहे. त्यांची अंगझडती व वाहन तपासणी केली असता त्यामध्ये रोख १ लाख ५७ हजार रुपये, ५ एचपी क्षमतेच्या १० पाणबुडी मोटारी, विदेशी दारूचे २३ बॉक्स, गुन्ह्यासाठी वापरण्यात आलेले महिंद्रा कंपनीचे बो-लेरो पिकअप वाहन (एम.एच. ४४ यू १३१६) असा मुद्देमाल मिळून आला. विविध चोरीचा माल विकून मिळालेली रक्कमच त्यांच्या ताब्यात आढळून आली. आरोपींनी कबुली दिली की, ते आपल्या इतर तीन फरार साथीदारांसह गेल्या एक वर्षापासून लातूर, धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन हद्दीत शेतशिवारातील पाणबुडी मोटारी, स्प्रिंकलर सेट, म्हशी चोरी करीत होते. शिरूर अनंतपाळ, अहमदपूर, कासार शिरसी, वैराग (जि. सोलापूर) या पोलीस ठाण्यामध्ये या टोळी विरुद्ध एकूण १० गंभीर गुन्हे उघड झाले आहेत.

## भारतीय राज्यघटनेच्या बळावरच देश कणखरपणे उभा – प्रो. डॉ. गायकवाड

### महासत्तेचे स्वप्न साकार करण्यासाठी युगपुरुष व थोर महात्म्यांचे विचारच आवश्यक – प्रा. प्रदीप रोडे

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

असंख्य स्वातंत्र्य सेनानींनी व नागरिकांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून जगात सर्वश्रेष्ठ ठरणारी लोकशाही भारताला दिली. राज्यघटनेच्या बळावरच आजचा समृद्ध भारत देश कणखरपणे उभा आहे, असे मत प्रो.डॉ. कॅप्टन सुरेश गायकवाड यांनी व्यक्त केले. तर राष्ट्रीय विकास म्हणजे अब्जावधी रुपयांच्या घोषणांचा व आश्वासनांचा पाऊस आणि विद्युत रोषणाईचा लखलखाट नव्हे तर स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या त्रिसूत्री मध्येच राष्ट्रीय विकास दडलेला आहे. भारताला महासत्ताक बनविण्यासाठी शाहू, फुले, आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार आत्मसात केले तरच भारताचे महासत्तेचे स्वप्न साकार होऊ शकेल असे मत तुलशी शिक्षण समूहाचे प्रमुख प्रा. प्रदीप रोडे यांनी व्यक्त केले.



छत्रपती संभाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित केलेल्या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून प्रो. डॉ. कॅप्टन सुरेश गायकवाड हे बोलत होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलशी शिक्षण समूहाचे प्रमुख प्रा. प्रदीप रोडे होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. नामदेव सानप यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व प्रमुख पाहुणे प्रो. डॉ. सुरेश गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तद्नंतर आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलतांना प्रो.डॉ. सुरेश गायकवाड म्हणाले की, भारतीय राज्यघटना नागरिकांनी आत्मसात करावी यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक शिक्षणाचा आग्रह धरला तळागाळातील वंचित, मागास घटकांच्या शिक्षणासाठी शाळा महाविद्यालये उघडली. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते जो कोणी प्राशन करेल ती व्यक्ती आपल्या न्याय हक्कासाठी गुरगुरल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना होता. शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या अधिकाराबरोबरच राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव नागरिकांना होईल. सामाजिक न्याय, समता व स्वातंत्र्याची भावना वाढीस लागू शकते असा ठाम विश्वास त्यांचा होता. भारतीय राज्यघटनेच्या बळावरच आज भारत एक समर्थ राष्ट्र म्हणून उभा आहे. नव्या पिढीने भारतीय राज्यघटनेचा विचार आत्मसात करण्याची आवश्यकता आहे असेही डॉ. गायकवाड यांनी म्हटले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना तुलशी शिक्षण समूहाचे प्रमुख प्रा. प्रदीप रोडे म्हणाले की, असंख्य स्वातंत्र्य सैनिकांच्या व नागरिकांच्या बलिदानातून भारताला स्वातंत्र्य मिळाले आहे, ही गोष्ट लक्षात घेऊन भारतीय राज्यघटनेत सामान्य नागरिकांना मताचा अमूल्य अधिकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रदान केला आहे. मतदानाचे महत्त्व लक्षात घेऊन नागरिकांनी हा देश लोकशाहीच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता आणि न्याय यात्रिसूत्रीवर विश्वास असणाऱ्यांच्या हाती सोपवला पाहिजे, असे ते म्हणाले. याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या विविध स्पर्धांचे पारितोषिकांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्राचार्य डॉ. नामदेव सानप यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. अस्मिता साळवे व रोहन त्रिभुवन यांनी केले. यावेळी प्रा. डॉ. प्रज्ञा किवंडे, प्रा. हर्षद वाघमारे, प्रा. ज्योती मोरे, प्रा. राजेंद्र भगत, प्रा.तुबा सय्यद, प्रा.प्रवीण पावहारे, प्रा. उत्कर्षा इंगोले, श्रीमती भिमाबाई मुनेश्वर, संतोष प्रधान, पवन मस्के, कविता वावळे वंदना ढेंबरे यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**

**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१५४५**

**दिनांक - १९/१२/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती अनिल अण्णासाहेब पाष्टे रा. पिठोरी शिरसगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अनिल अण्णासाहेब पाष्टे | स्वतः | ०१/०६/१९८० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-१९/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## दहिपुरी येथे 'आनंदनगरी' व 'हळदी-कुंकू' उपक्रम

अंबड। प्रतिनिधी

माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर, दहिपुरी येथे आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय 'आनंदनगरी' व 'हळदी-कुंकू' उपक्रमांनी शाळा परिसर उत्साह, आनंद आणि एकोप्याने बहरून गेला. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या 'आनंदनगरी'त विविध खाद्यपदार्थांचे आकर्षक स्टॉल उभारण्यात आले होते. उपस्थितांसाठी स्वादिष्ट खिचडीची व्यवस्था करण्यात आली होती. सर्व सोयी-सुविधांसह कार्यक्रम आनंददायी वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.



दुसऱ्या दिवशी हळदी-कुंकू निमित्त महिलांसाठी चमचा-लिंबू, संगीत खुर्ची व बॉल पासिंग या मनोरंजक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पुढीलप्रमाणे क्रमांक पटकावले चमचा-लिंबू स्पर्धा सविता वाखेरे, ज्योती निर्मळ, रोहिणी केसकर, संगीत खुर्ची अनुप्रिया ठापे वृंदावनी शिकारे, अशोकराव वाखेरे, बॉल पासिंग रोहिणी केसकर पायल निर्मळ संतोषी कांबळे, स्पर्धेतील विजेत्यांना संस्थेचे सचिव अमोल खरात, मुख्याध्यापक श्री. दिनेश ठाकूर व पालक प्रतिनिधी टापरे भाऊ यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमामुळे शाळा, शिक्षक आणि पालक यांच्यातील आत्मीयता व समन्वय अधिक दृढ झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पटेले (एच.के.) यांनी केले, तर प्रास्ताविक श्रीमती पनाड (पी.यू.) यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मयुरी चौधरी मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. शिक्षक अजित खरात यांनी स्पर्धांसाठी बक्षिसे तसेच स्पर्धेत सहभागी न झालेल्या महिलांसाठी स्वखर्चातून २०० पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या उपलब्ध करून दिल्या. या कार्यक्रमात राठोड (पी.आर.), पटेले (एच.के.), उगले (पी.एस.), श्रीमती पनाड (पी.यू.), शिंगणे (के.बी.), अंबडकर (एस.के.), ढेंबरे (बी.ए.), खरात (ए.सी.), श्रीमती लिहिणार (आर.बी.) आणि खरात (एस.पी.) यांनी मोलाचे सहकार्य केले. विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत आनंद, एकोपा आणि संस्कार यांचे सुंदर दर्शन या उपक्रमातून घडले.

## थोडक्यात



### अवैध वाळू तस्करीवर पोलिसांचा छापा

संभाजीनगर। प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील नायगाव येथील गोदावरी नदीतून दररोज रात्री मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या अवैध वाळू तस्करीविरोधात पैठण पोलिसांनी कडक कारवाई करत तब्बल १२ लाख २२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी चार वाळू तस्करांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नायगाव परिसरात गेल्या काही दिवसांपासून रात्रीच्या वेळेस गोदावरी नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा व वाहतूक सुरू होती. या अवैध वाळू तस्करीमुळे नदीकाठावरील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान होत असून पाण्याच्या पाईपलाईन फुटण्याच्या तक्रारीही वाढल्या होत्या. या पार्श्वभूमीवर पैठण पोलिसांनी कारवाईची मोहीम हाती घेतली. उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील आणि पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २६ जानेवारी रोजी पहाटे पैठण पोलीस पथकाने नायगाव येथील गोदावरी नदीपात्रात अचानक छापा टाकला. या कारवाईत गौतम कारभारी बल्लाळ (रा. चनकवाडी), हनुमान सदाशिव गिरगे (रा. नायगाव), गणेश सदाशिव गिरगे (रा. वडवळी) आणि तीर्थराज दत्तात्रय गिरगे (रा. नायगाव) हे तीन ट्रॅक्टरला यारी मशीन लावून अवैधरित्या वाळू उपसा व वाहतूक करताना आढळून आले. पोलीस पथकाने पंचनामा करून तीन ट्रॅक्टर, वाळू उपशासाठी वापरण्यात येणारी यारी मशीन तसेच एक ब्रास वाळू वाहतूक करणारे छोटे वाहन असा एकूण १२ लाख २२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास जमादार राजेश आटोळे करीत आहेत.

### गुरु तेग बहादूर यांच्या शौर्यगाथेचा इतिहास घराघरांत पोहोचवू – मुख्यमंत्री

नांदेड । प्रतिनिधी

शिखांचे नववे गुरु तेग बहादूर यांचे बलिदान हे केवळ शीख समाजापुरते मर्यादित नव्हते, तर ते समस्त मानव जातीच्या आणि सनातन धर्माच्या रक्षणासाठी होते. औरंगजेबाच्या क्रूर अत्याचाराविरोधात त्यांनी दिलेला लढा आणि त्यांची शौर्यगाथा केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशातील सर्व समाजघटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आमचे सरकार कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नांदेड येथील कौठा भागातील मोदी मैदानावर गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या हिंद-दी-चादर शहीदी समागम सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात जनसमुदायाला संबोधित करताना मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संत बाबा कुलवंतसिंघ, संत बाबा बलविंदरसिंघ, संत बाबा हरनामसिंघ यांच्यासह राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण, मंत्री पंकजा मुंडे, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, पालकमंत्री अतुल सावे, मंत्री गिरीष महाजन, मंत्री बाबासाहेब पाटील आणि गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबिरसिंघ आदी मान्यवर उपस्थित होते. शीख समाजासोबतच बंजारा, सिंधी, शिकलकरी, वाल्मिकी आणि वारकरी हा नानक नामलेवा समाज देशभरात विखुरलेला आहे. या सर्व समाजांना एकत्रित आणून गुरु तेग बहादूर यांच्या बलिदानाचा इतिहास गावागावांत आणि वस्त्यावस्त्यांत पोहोचवण्याचे आमचे प्रयत्न सुरू आहेत. नागपूर आणि नांदेडनंतर आता नवी मुंबई येथेही हिंद-दी-चादर समागम होणार असून, त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रित करण्याचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दैनिक
# राज्य लोकतंत्र



# बीड न.प.च्या विषय समित्यांची निवड

## उपाध्यक्ष विनोद मुळूक यांच्याकडे पाणीपुरवठा, बांधकाम संजय उडान, स्वच्छता शेख निजाम, नियोजन बाळासाहेब गुंजाळ, महिला व बालकल्याण आरती बनसोडे, शिक्षण व विद्युत सिमा जकी सौदागर तर स्थायी समितीवर अमर नाईकवाडे

बीड । प्रतिनिधी

बीड नगर परिषदेच्या सभापतीपदाची निवडणुक बिनविरोध पार पडली. शिव-शाहू-फुले-आंबेडकर-मौलाना आझाद बीड शहर विकास आघाडीकडून उपाध्यक्ष विनोद मुळूक यांना पाणीपुरवठा, बांधकाम सभापतीपदी संजय उडान, स्वच्छता सभापतीपदी शेख निजाम, नियोजन सभापतीपदी बाळासाहेब गुंजाळ, महिला व बालकल्याण सभापतीपदी आरती बनसोडे, उपसभापती पदी शेख शबनम बिलाल, शिक्षण व विद्युत सभापतीपदी मोमीन सिमा जकी सौदागर तर स्थायी समितीवर अमर नाईकवाडे यांना संधी देण्यात आली.



बीड नगर परिषदेच्या विषय समित्यांची निवडणुक प्रक्रिया मंगळवार, दि.२७ रोजी संपन्न झाली. पिठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी काम पाहिले. विषय समित्यांची सदस्य संख्या १४ करण्याचा ठराव करून उपाध्यक्षांना पाणीपुरवठा व जलनिस्सारण समितीचे पदसिध्द सभापती म्हणून निवड करण्याचा निर्णय पहिल्या बैठकीत करण्यात आला. विषय समित्यांवर नगर परिषद सदस्यांचे नामनिर्देशन झाल्यानंतर समितीच्या सभापती पदासाठी निवडणुक प्रक्रिया पार पडली. विहित मुदतीत केवळ शिव-शाहू-फुले-आंबेडकर-मौलाना आझाद बीड शहर विकास आघाडीकडून नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आले, त्यामुळे ही निवडणुक प्रक्रिया बिनविरोध संपन्न झाली. आघाडीचे गटनेते फारुक पटेल यांनी प्रत्येक विषय समितीसाठी सात सदस्यांच्या नावांची शिफारस पिठासीन अधिकारी यांच्याकडे केली. स्थायी समितीसाठी ज्येष्ठ व अनुभवी नगरसेवक अमर नाईकवाडे यांच्या नावाची शिफारस करण्यात आली.

शिव-शाहू-फुले-आंबेडकर-मौलाना आझाद बीड शहर विकास आघाडीच्यावतीने सार्वजनिक बांधकाम समितीच्या सभापतीपदी संजय उडान, स्वच्छता, वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समितीच्या सभापतीपदी शेख निजाम, नियोजन व विकास समितीच्या सभापतीपदी धर्मराज उर्फ बाळासाहेब गुंजाळ, शिक्षण, विद्युत, क्रीडा व सांस्कृतिक समितीच्या सभापतीपदी मोमीन सीमा परवीन अब्दुल रशिद उर्फ सीमा जकी सौदागर, महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी आरती रंजित बनसोडे, उपसभापती पदी शेख शबनम बिलाल यांना संधी देण्यात आली आहे. नवनिर्वाचित सभापतींचा 'शिवछत्र येथे यथोचित सन्मान करून त्यांना भविष्यकालीन वाटचालीसाठी आ. विजयसिंह पंडित ◀◀ पान ३ वर

# करमाळा बायपासवर भिषण अपघातात तरुणाचा मृत्यू

आष्टी । प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील अनगर येथील साखर कारखान्यावर कामासाठी गेलेल्या आष्टी तालुक्यातील ऊसतोड मजुराचा करमाळा बायपास रोडवर भीषण अपघातात मृत्यू झाला. बाळासाहेब नवनाथ नरवडे (रा. आंबेवाडी, ता. आष्टी) असे या दुर्दैवी तरुणाचे नाव आहे. विशेष म्हणजे, या अपघातात बाळासाहेबांसोबत असलेल्या त्यांच्या पाळीव कुत्र्याचाही मृत्यू झाला असून, या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



बाळासाहेब नरवडे हे अनगर येथील साखर कारखान्यावर ऊसतोड मजूर म्हणून काम करत होते. सोमवारी (दि. २६) काही वैयक्तिक कामासाठी ते कारखान्यावरून आपल्या गावी, आंबेवाडीकडे दुचाकीवरून निघाले होते. दुपारी चारच्या सुमारास करमाळा शहराच्या बायपास रोडवरून जात असताना, अचानक त्यांच्या दुचाकीचा तोल गेला आणि ते रस्त्यावर पडले.

दुर्दैवाने, त्याच वेळी पाठीमागून येणारे एक सुसाट वाहन त्यांच्या अंगावरून गेल्याने बाळासाहेब यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्यासोबत दुचाकीवर गळ्यात ◀◀ पान ३ वर



बीड : येथील नगरपरिषदेच्या स्थायी समितीच्या सदस्यपदी डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करताना भाजपचे सर्व नगरसेवक.

# मंत्री संजय शिरसाट यांच्या प्रमुख उपस्थितीत चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे महाकरंडकाचा भव्य उद्घाटन सोहळा!

बीड । प्रतिनिधी

नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकलेचा अनोखा महाकुंभ बनलेला चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक बीड जिल्ह्याच्या कलाक्षेत्रात मानबिंदू ठरला असून बालकलाकारांच्या या कला सोहळ्याचा उदघाटन समारंभ शिवसेनेचे महाराष्ट्र राज्य सामाजिक न्याय मंत्री ना. संजयजी शिरसाट साहेब आणि त्यांच्या कन्या



हर्षदाताई शिरसाट यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. दि. २ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सलग चौथ्या वर्षी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली चंपावती महोत्सवाच्या माध्यमातून कलेचा भव्य महासोहळा साजरा होत आहे.

काल दि. २७ जानेवारी २०२६ रोजी शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी छत्रपती संभाजीनगर येथे मंत्री मा. ना. संजयजी शिरसाट साहेब यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन बाल कलाकारांच्या या महोत्सवाचे अधिकृत आमंत्रण दिले. यावेळी मंत्री शिरसाट साहेब यांनी मी नक्की येणार... असे आश्वासन देत या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री ◀◀ पान ३ वर

# दिनेश शेटजींचे योगदान काय? बीड स्वीकृत सदस्य निवडीवरून माजी नगरसेवक रमेश चव्हाण आक्रमक!

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेच्या स्वीकृत सदस्य निवडीवरून सध्या राजकीय वर्तुळात वादाचा धुराळा उडाला असून, माजी नगरसेवक रमेश चव्हाण यांनी पक्ष नेतृत्वाच्या निर्णयावर शेलक्या शब्दांत टीका केली आहे. पक्षाशी गद्दारी करणाऱ्यांना बक्षीस आणि निष्ठावंतांना वनवास असेच काहीसे चित्र सध्या बीडमध्ये पाहायला मिळत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. विशेषतः दिनेश शेठजी यांना मिळालेल्या संधीमुळे कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, आता दिनेश शेठजींना खरेदी-विक्री सभापतीच करून टाका, असा उपरोधिक टोलाही चव्हाण यांनी लगावला आहे.



काही दिवसांपूर्वीच बीड नगरपालिकेत स्वीकृत सदस्यांच्या निवडी पार पडल्या. यामध्ये दिनेश शेठजी यांची वर्णी लावण्यात आली आहे, ज्यांनी गेल्या निवडणुकीत पक्षाच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात उघडपणे रसद पुरवली होती, असा गंभीर आरोप चव्हाण यांनी केला आहे. आपल्याच पक्षाचे उमेदवार पडतील यासाठी ज्यांनी आर्थिक ताकद लावली, त्यांनाच आज पक्षाने मानाचे पद बहाल केल्याने रमेश चव्हाण यांनी संताप व्यक्त केला आहे. पक्षाच्या उमेदवारांना पाडण्याचे काम प्रामाणिकपणे करणाऱ्या या दिनेश शेठजींना हे सदस्यत्व म्हणजे पक्षाकडून मिळालेले बक्षीस आहे का? असा जळजळीत सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

या निवडीमुळे बीडच्या जनतेत आणि कार्यकर्त्यांमध्ये अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. नगरपरिषदेच्या विकासकामात किंवा शहराच्या सामाजिक जडणघडणीत दिनेश शेठजी मुंदडा यांचे योगदान शून्य असताना केवळ पैशाच्या जोरावर त्यांना पद दिले गेल्याचा आरोप होत आहे. पक्षासाठी रात्रंदिवस राबणाऱ्या आणि लाठ्याकाठ्या खाणाऱ्या कार्यकर्त्यांवर हा अन्याय नाही का, असा सूर आता उमटू लागला आहे. या वादग्रस्त निवडीमुळे निष्ठावंत कार्यकर्त्यांचे खच्चीकरण होत असून, आगामी काळात याचे पडसाद उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही. जनतेच्या मनात या निवडीबद्दल निर्माण झालेले प्रश्न आता पक्ष श्रेष्ठींपर्यंत पोहोचतात की नाही, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# आ. नमिता मुंदडा, जिल्हाधिकारी जॉन्सन यांची योगेश्वरी विज्ञान केंद्र व तारांगणास भेट

अंबाजोगाई । प्रतिनिधी

केज विधानसभा मतदारसंघाच्या आ. नमिता मुंदडा, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह इतर प्रशासकीय अधिकाऱ्यांनी योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित पू.बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्र व तारांगणास सदिच्छा भेट दिली.या भेटीदरम्यान त्यांनी विज्ञान केंद्रातील विविध प्रयोगात्मक मांडणी व तारांगणातील शैक्षणिक उपक्रमांची पाहणी करत विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी या केंद्राचे महत्त्व अधोरेखित केले. जिल्हाधिकारी



जॉन्सन यांनी विज्ञान व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नवनवीन संधी उपलब्ध करून देण्यासाठी अशा उपक्रमांना प्रशासनाकडून निश्चितच सहकार्य राहणार असल्याचे मत व्यक्त केले.मान्यवरांच्या भेटीमुळे योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित पू. बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्राच्या कार्यास नवी प्रेरणा मिळाली असून भविष्यात अधिक व्यापक शैक्षणिक उपक्रम राबविण्याचा विश्वास अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी या प्रसंगी व्यक्त केला. मान्यवरांचे स्वागत योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर उपाध्यक्ष जी.बी.व्यास,योगेश्वरी सैनिक स्कूलचे प्राचार्य मेजर एस.पी. कुलकर्णी,योगेश्वरी पॉलिटेक्निकचे प्राचार्य रमण देशपांडे,हेमंत धानोरकर,रविंद्र मठपती आदींनी मान्यवरांचे स्वागत केले.यावेळी उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे, तहसीलदार विलास तरंगे,नायब तहसीलदार स्मिता बाहेती व महसूल विभागातील इतर अधिकारी व नगरसेवक उपस्थित होते.

# नोएडा येथील प्रो-रेसलिंग लीगमध्ये बीडच्या तोडकरचा दणदणीत विजय

आष्टी । प्रतिनिधी

उत्तर प्रदेशातील नोएडा येथे आयोजित करण्यात आलेल्या झथङ (प्रो रेसलिंग लीग) स्पर्धेत देशभरातील नामवंत पैलवानांचा सहभाग असून या स्पर्धेत महाराष्ट्र राज्यातून केवळ एका खेळाडूची निवड करण्यात आली आहे. या निलाव पद्धतीत तो खेळाडू ३ लाख रुपयांना विकत घेण्यात आला असून, ही मानाची संधी बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील मंगरूळ गावचा सुपुत्र अतिश सुनील तोडकर याला मिळाली आहे.



अतिश हा अत्यंत गरीब कुटुंबातून पुढे आलेला पैलवान असून, मुलगा पैलवान व्हावा या ध्येयासाठी त्याच्या वडिलांनी स्वतःची ५ एकर शेती विकून प्रशिक्षणासाठी आर्थिक पाठबळ दिले. कठोर सराव, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर अतिशने राष्ट्रीय स्तरावर स्वतःची ओळख निर्माण केली आहे.

त्याच्या अथक परिश्रमाची दखल घेत काही दिवसांपूर्वी त्याला क्रीडा कोट्यातून भारतीय रेल्वेमध्ये ◀◀ पान ३ वर

# धुनकवाडचे सुपुत्र राम यादव यांची पोलिस उपनिरीक्षकपदी नियुक्ती

वडवणी । प्रतिनिधी

धुनकवाड येथील सुपुत्र राम एकनाथ यादव यांची पोलीस उपनिरीक्षक पदी नियुक्ती झाल्याने धुनकवाडसह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



राम यादव हे गेल्या अनेक वर्षांपासून पोलीस दलात कार्यरत असून सध्या ते शिरूर पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. आपल्या सेवाकाळात त्यांनी प्रामाणिकपणा, शिस्त, कर्तव्यदक्षता व जनतेशी सौजन्यपूर्ण वागणूक या गुणांच्या जोरावर एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. बीड जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये त्यांनी जबाबदारीने सेवा बजावत अनेक गुन्ह्यांच्या तपासात ◀◀ पान ३ वर

# तीन अपत्य प्रकरणात घळाटवाडीच्या सरपंचांवर टांगती तलवार

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १४ (ज-१) चे उल्लंघन केल्याचा ठपका ठेवत घळाटवाडी (ता. माजलगाव, जि. बीड) येथील विद्यमान सरपंच श्रीम. संगिता हरिभाऊ येताळ यांचे सरपंच पद रद्द करण्यात यावे, अशी ठोस मागणी ग्रामस्थ व मतदार विशाल चांगदेव ससाणे यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या न्यायालयात दाखल केलेल्या अपीलद्वारे केली आहे. या प्रकरणामुळे माजलगाव तालुक्यात मोठी चर्चा सुरू झाली आहे.



अपीलमध्ये नमूद करण्यात आले आहे की, ग्रामपंचायत सरपंच सार्वत्रिक निवडणूक २०२३ दरम्यान संगिता येताळ यांनी महिला राखीव जागेतून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. नामनिर्देशनपत्र भरताना शासनाने घालून दिलेल्या अटी व नियमांनुसार संपूर्ण व खरी माहिती देणे बंधनकारक असताना, त्यांनी केवळ दोन अपत्य असल्याचे स्वयंघोषणापत्र सादर केले. मात्र प्रत्यक्षात त्यांना तीन अपत्ये असून ही बाब जाणीवपूर्वक निवडणूक अधिकाऱ्यांपासून लपवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

अपीलार्थी विशाल ससाणे यांनी सादर केलेल्या कागदपत्रांनुसार, संगिता येताळ यांचे पहिले अपत्य अंजना हरिभाऊ येताळ असून तिची जन्मतारीख २० ऑक्टोबर १९९७ अशी शालेय प्रवेश निर्गम उताऱ्यावर नमूद आहे. दुसरे अपत्य वैजनाथ हरिभाऊ येताळ याची जन्मतारीख ९ मार्च २००१ असून, संबंधित शाळांचे अभिलेख उपलब्ध आहेत. याशिवाय तिसरे अपत्य असल्याचे पुरावेही सादर करण्यात आले असून, या सर्व बाबी नामनिर्देशनपत्रात नमूद न केल्याचा गंभीर आरोप अपीलमध्ये करण्यात आला आहे.

या प्रकरणी जिल्हाधिकारी बीड यांच्या न्यायालयात दिनांक १६ ऑक्टोबर २०२५, ३० ऑक्टोबर २०२५ तसेच ७ ऑगस्ट २०२५ रोजी सुनावण्या ठेवण्यात आल्या आहेत. ◀◀ पान ३ वर

# शेवटच्या चेंडूवर सामना फिरला!

## श्रीराम योद्धा वॉरियर्सचा धोंडे वॉरियर्सकडून निसटता पराभव; विकास वाघुळेची झुंजार पारी ४८ धावांची झळाळी

आष्टी । प्रतिनिधी

मराठवाडा भूषण लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित आष्टी महोत्सव २०२६ अंतर्गत सालाबादप्रमाणे यंदाही एपीएल क्रिकेट स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी झालेल्या शेवटच्या व अत्यंत रोमांचक सामन्यात धोंडे वॉरियर्स आणि श्रीराम योद्धा वॉरियर्स या दोन बलाढ्य संघांमध्ये अटीतटीचा सामना रंगला.

प्रथम फलंदाजी करत श्रीराम योद्धा



वॉरियर्सने दमदार खेळी करत ९९ धावा उभारल्या. प्रत्युत्तरात धोंडे वॉरियर्सला १०१ धावांचे लक्ष्य देण्यात आले होते. सामना शेवटच्या चेंडूपर्यंत ताणला गेला आणि अखेर शेवटच्या बॉलवर धोंडे वॉरियर्सने विजय खेचून आणला.

या सामन्यात श्रीराम योद्धा संघाकडून विकास वाघुळेने आक्रमक फलंदाजी करत ४८ धावांची शानदार पारी खेळली. मात्र दुर्दैवाने तो बाद झाल्यानंतर सामन्याचे चित्र पूर्णतः बदलले.

◀◀ पान ३ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
बुधवार दि.२८ जानेवारी २०२६ । पान ७

# पुणे पोलिसांकडून तस्करी करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यासह टोळीला बेड्या

**पुणे । प्रतिनिधी**

सदरक्षणाय खलनिग्रहनाय या ब्रीदला अनुसरुन पोलीस काम करतात, म्हणजे गुन्हेगारांचे कर्दनकाळ सज्जनांचे रक्षक म्हणून पोलिसांकडे (झेश्रळलश) पाहिले जाते. मात्र, पोलिसांच्या खाकी वर्दीला काळा डाग लावण्याचं काम अहिल्यानगर पोलीस दलातील एका कर्मचाऱ्याने केलं आहे. अहिल्यानगर पोलीस दलातील पोलीस कॉन्स्टेबल शामसुंदर गुजर आणि त्याच्या टोळीला अंमली पदार्थांच्या तस्करी प्रकरणी पुणे ग्रामीण पोलिसांकडून अटक करण्यात आली. अहिल्यानगर (-हळश्रूरपरसरी) पोलीस दलातील काही अधिकारी संशयाच्या भोवऱ्यात असून अहिल्यानगर पोलिसांनी जप्त केलेले अंमली पदार्थ मुद्देमाल कक्षातून चोरुन हा कॉन्स्टेबल हे अंमली पदार्थ बाहेर विकत होता. अहिल्यानगर पोलिस दलातील कॉन्स्टेबल शामसुंदर गुजर हा स्वतः अंमली पदार्थांची विक्री



करत असल्याचं समोर आलंय. या प्रकरणात अहिल्यानगर पोलीस दलातील आणखी कोणी पोलीस अधिकारी सहभागी आहेत का याचा तपास पुणे पोलिसांकडून सुरू आहे

अहिल्यानगर पोलिसाच्या सहभागाच्या या प्रकरणाची सुरुवात झाली १७ जानेवारीला, जेव्हा पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील शादाब शेख या गॅरेज चालकाला पुणे पोलिसांनी अटक केली. शादाब शेख हा त्याच्या दुचाकीवरुन अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी येणार असल्याचं पुणे ग्रामीण पोलिसांना समजलं होतं. पोलिसांनी त्याला एक किलो अंमली पदार्थसह रंगेहात पकडलं. अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील ज्ञानदेव उर्फ माऊली शिंदे, ऋषिकेश चित्तर, महेश गायकवाड यांच्याकडून त्याने अंमली पदार्थ आणल्याचे त्याच्याकडे केलेल्या चौकशीतून समोर आलं आहे.

पुणे पोलिसांनी या आरोपींना अटक केली असता त्यांच्याकडे उर्वरित ९ किलो ६५५ ग्रॅम वजनाचे अमली पदार्थ मिळून आले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ कुठून आणले याचा पोलिसांनी पुढे शोध सुरू केला असता हे अमली पदार्थ नगर पोलीस दलातील शामसुंदर गुजर याने त्यांना दिल्याचं समोर आलं. शामसुंदर गुजर हा अहिल्यानगर पोलीस दलात पोलीस हवालदार पदावर कार्यरत आहे. आत्तापर्यंत या प्रकरणात १० किलो ७०७ ग्रॅम वजनाचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. श्यामसुंदर गुजर हा हवालदार मुद्देमाल कक्षात ठेवण्यात आलेल्या अमली पदार्थांच्या गुन्ह्यात जप्त करण्यात आलेले अमली पदार्थ काढून त्याची विक्री करत असल्याने पोलीस दलात खळबळ उडाली.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सहभाग?**

पुण्यातील शिरूर शहरात गॅरेज चालकाच्या माध्यमातून मिळालेल्या अमली पदार्थाचे धागे धोरे अहिल्यानगर जिल्ह्यातील पोलीस ठाण्यापर्यंत पसरले आहेत. पोलिसांनी एकूण पाच आरोपींना पुणे ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतलं असून १० किलो ७०० ग्रॅम वजनाचे अंमली पदार्थांसोबत गुन्ह्यात वापरलेली वाहने हस्तगत केली आहेत. पोलिसांनी जप्त केलेले अंमली पदार्थ कोर्टाच्या आदेशानुसार सील केले जातात आणि अधिकाऱ्यांच्या सहीने मुद्देमाल कक्षात ठेवले जातात. शामसुंदर गुजर जप्त केलेला मुद्देमाल काढून त्या जागी तशाच दिसणाऱ्या वस्तु ठेवत होता. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सहभागाशिवाय हे शक्य नसल्याचं मानलं जातं आहे. अहिल्यानगर पोलिसांनी मे २०२५ मधे श्रीरामपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जप्त केलेला हा मुद्देमाल होता. डिसेंबर महिन्यात श्यामसुंदर गुजरने तो मुद्देमाल कक्षातून चोरला होता. दरम्यान, राजकीय लोकाचा यात सहभाग अजून तरी आढळून आलेला नाही. मात्र, याप्रकरणी अधिक तपास करायचा आहे, असे पुणे ग्रामीण पोलिसांनी सांगितले.

## भर रस्त्यात पतीकडून १९ वर्षीय पत्नीची निर्घृण हत्या; पोलिसांकडून पतीला बेड्या




**पुणे । प्रतिनिधी**

कौटुंबिक वादातून पतीने पत्नीवर तिक्ष्ण शस्त्राने वार करून खून केल्याची घटना नगर रस्त्यावरील वाडेबोल्हाई गावात घडली. या प्रकरणी पोलिसांनी पतीला अटक केली. नम्रता शैलेंद्र व्हटकर (वय १९, रा. बालाजी सोसायटी, शिरसवाडी, वाडेबोल्हाई, नगर रस्ता) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. या प्रकरणी पती शैलेंद्र प्रकाश व्हटकर (वय ३०, रा. बकोरी, ता. हवेली, नगर रस्ता) याला अटक करण्यात आली आहे. याबाबत शाहरुख दस्तगीर पठाण (वय २३, रा. बालाजी सोसायटी, शिरसवाडी, वाडेबोल्हाई, नगर रस्ता) याने लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, आरोपी शैलेंद्र आणि त्याची पत्नी नम्रता यांच्यात कौटुंबिक कारणावरुन वाद व्हायचे. शैलेंद्रने तिच्याकडे सोन्याचे दागिने मागितले होते. या कारणावरुन झालेल्या वादातून गुरुवारी (दि. २२) शैलेंद्रने रात्री साडेनऊच्या सुमारास नम्रतावर तीक्ष्ण शस्त्राने वार केले. नम्रताला रुग्णालयात दाखल केले असता उपचारांपूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. पोलीस उपायुक्त सोमय मुंडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव कुंभार यांनी घटनास्थळी पाहणी केली. पसार झालेला आरोपी शैलेंद्र याला अटक करण्यात आली. गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक खेडकर तपास करत आहेत.

## शालार्थ आयडी कागदपत्रे अपलोड न केल्यास शिक्षकांचा पगार थांबणार

**पुणे । प्रतिनिधी**

शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १५ फेबुवारीपर्यंत त्यांच्या शालार्थ आयडीसंदर्भातील वैध कागदपत्रे डीडीओ २ स्तरावरील लॉगिंनमधून डिजिटल सर्व्हिस रेकॉर्डस या प्रणालीअंतर्गत अपलोड करावी लागणार आहेत. जे कर्मचारी संबंधित कागदपत्रे अपलोड करणार नाहीत अशा कर्मचाऱ्यांचे पगार थांबवण्याचे स्पष्ट निर्देश माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने दिले आहेत.



शालार्थ प्रणालीवर योग्य कागदपत्रे अपलोड न झालेल्या कर्मचाऱ्यांचे व त्या शाळेच्या मुख्याध्यापकांचे वेतन व इतर भत्ते तसेच थकीत वेतन, वैद्यकीय बिले १५ फेबुवारी २०२६ पासून खासगी अनुदानित शाळांमधील कर्मचाऱ्यांना देण्यात येणार नाही. ज्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे शालार्थ प्रणालीवरील कागदपत्रे डीडीओ-२, शिक्षणाधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक, सचिव स्तरावर नाकारण्यात आली असतील तर त्याबाबत वैध, अवैधचा निर्णय संबंधित क्षेत्रीय अधिकारी यांनी तातडीने देणे अनिवार्य करण्यात आले आहे. डीडीओ-२ स्तरावरील लॉगिंनमधून डिजिटल सव्हिस रेकॉर्डस या प्रणालीअंतर्गत अपलोड झालेल्या नोंदीसंदर्भात आवक नोंदीबाबत कार्यवाही न केल्यास डीडीओ-२ यांना त्या देयकांचे एमटीआर ४४ ए जनरेट करता येणार नाहीत. चतुर्थश्रेणी कर्मचारी यांचे वय ६० पेक्षा जास्त, व इतर करिता वय ५८ पेक्षा जास्त तथा कमांडंट पदावरील वय ६२ असल्यास अशा कर्मचाऱ्यांच्या जन्म तारखेबाबत डीडीओ-१ व डीडीओ-२ यांनी तपासणी करून काही बदल असल्यास उपसंचालक यांच्याकडून संबंधित जन्मतारीख बदल करून घेण्याची कार्यवाही १५ फेबुवारी २०२६ पूर्वी पूर्ण करावी. याबाबत आवश्यक ते तांत्रिक व्हॅलिडेशन शालार्थ प्रणालीमध्ये होणार आहे. संच मान्यतेमधील मंजूर पदांपेक्षा अधिकच्या पदांचे वेतन व भत्ते, थकीत देयके आदी अदा करता येणार नाही.



## ओतूरजवळ भीषण अपघात: स्विफ्ट कार पलटी होऊन दोन तरुणांचा जागीच मृत्यू

**ओतूर । प्रतिनिधी**

ओतूर (ता. जुन्नर) हद्दीतील अहिल्यानगर-कल्याण महामार्गावरील कोळमाथा येथे नंदलाल लॉन्ससमोर स्विफ्ट कार पलटी होऊन झालेल्या भीषण अपघातात दोन तरुण जागीच ठार झाले, तर दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. हा भीषण अपघात आज (दि. २७) पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास घडला.

वरद एकनाथ तांबे (रा.ओतूर) व करण पवळे (रा. पिरंगुट) असे या अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. अभिनव गणेश वाकचौरे व ओंकार गोरक्ष शिंदे (रा. साकूर मांडवे) हे दोघे गंभीर जखमी आहेत. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आहे. चालकाला पुरेशी झोप मिळाली नसल्यामुळे डुलकी येऊन अपघात घडल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. हे चारही तरुण अत्यंत सोज्वळ आणि कामकाजी असल्यामुळे ओतूर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या अपघाताबाबत ओतूर पोलिस तपास करीत आहेत.


## राजगडावर दुर्दैवी घटना; चढाईदरम्यान २१ वर्षीय पर्यटकाचा मृत्यू

**खडकवासला । प्रतिनिधी**

राजगड किल्ल्यावर अतिबिकट गुंजवणे दरवाजा मार्गाने चढाई करताना दमछाक झालेल्या २१ वर्षीय पर्यटकाचा हृदयविकाराच्या तीव झटक्याने दुर्दैवी मृत्यू झाला. ही दुर्घटना आज रविवारी (दि. २५) सकाळी दहाच्या सुमारास घडली. नागराज कोरे (वय २१, मूळ रा. बेळगाव कर्नाटक, सध्या रा. पुणे) असे मृताचे नाव आहे. नागराज हा पुण्यातील आपल्या पाच-सहा मित्रांबरोबर राजगडावर फिरण्यासाठी आला होता.

नागराज व त्याचे सहकारी मित्र गुंजवणे दरवाजा मार्गाने गडावर चढाई करीत होते. गुंजवणे प्रवेशद्वाराच्या खाली अतिबिकट टप्प्यात चढाई करताना नागराजला दम लागला. चक्कर येऊन पडलेल्या नागराजला धीर देऊन उठविले.

त्यानंतरही त्याने चढाई सुरू ठेवल्याने दम लागून त्याच्या छातीत दुखू लागले. काही वेळातच तो खाली कोसळला. पुरातत्व विभागाचे सुरक्षा रक्षक विशाल पिलावरे यांना



माहिती मिळताच स्थानिक युवक गणेश ढेबे, युवराज पाटील समीर कामठे, गणेश दीक्षित तसेच काही पर्यटकांसह त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. रुग्णालयात आणण्यापूर्वीच नागराज चा मृत्यू झाला होता. त्याचे वय अवघे २१ वर्षांचे आहे. अतिबिकट, उंच कड्यातील पायी मार्गाने चढाई करताना दमछाक होऊन तो खाली कोसळला. नंतर पुन्हा उठून तो चढाई करीत असताना त्याचा मृत्यू झाला. हृदयविकाराने अथवा इतर कारणांमुळे नागराजचा मृत्यू झाला, हे शवविच्छेदनानंतर स्पष्ट होईल.

## तर दीप्ती वाचली असती; आयोगावर महिलांचा संताप

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील हुंडाबळीच्या सलग घटनांनी समाजमन सुन्न झाले आहे. वैष्णवी हगवणे प्रकरण संपतेच तोवर उरुळी कांचनमध्ये एका उच्चशिक्षित इंजिनियर विवाहितेने सासरच्या छळाला कंटाळून आपली जीवनयात्रा संपवली आहे. या घटनेने पुण्यासह महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणी महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी या घटनेची माहिती मिळताच त्यांनी दीप्तीच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यावर महिला संतापल्याचे दिसून आले. महिलांनी थेट रुपाली चाकणकर यांना वैष्णवी हगवणे प्रकरण झालं. त्यानंतर तुम्ही कायद्यात काही बदल केले का? असा थेट सवाल केला.



कायद्यात बदल केले असते तर दीप्ती वाचली असती असे म्हणत महिलांनी आयोगावर संताप व्यक्त केला. आमच्या मुली स्वस्त झाल्या आहेत का? असे देखील महिला म्हणाल्या. आत्महत्या केलेल्या विवाहितेची सासू ही भाजप पक्षातून सरपंच आहे. तर सासरे शिक्षक असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या घटनेनंतर महिला आयोगाच्या भूमिकेकडे लक्ष असणार आहे. कुठल्याही महिलेला किंवा लेकीला त्रास झाला तर तिने तातडीने कळवायला हवे. आपण ठामपणे तिच्या पाठीशी आपण उभे राहायला हवे. तुम्ही पोलिसांकडे तक्रार दाखल केली त्यासाठी अनेक पथकं आहेत. सासरी नांदणाऱ्या लेकीला त्रास झाला तर तिच्यासाठी काय? तर तिच्यासाठी काही व्यासपीठ आहेत, असे रुपाली चाकणकर म्हणाल्या.

आमची टीम वेगळ्या पद्धतीने काम करते. कायदा हा खूप कठोर आहे. कायद्याच्या चौकटीतून या सगळ्या प्रक्रिया होत राहतात. महाराष्ट्रातील कायदा हा भारतातील सर्वात सक्षम काम करतो. म्हणून तुम्हाला काही शंका असतील तर जरुर सांगा, असे आवाहन रुपाली चाकणकर यांनी केले.

**दीप्तीच्या आईचे गंभीर आरोप...**

माहेरच्यांनी एकदा १० लाख रुपये रोख, गाडी घेण्यासाठी २५ लाख रुपये दिले होते. यानंतरही चारचाकी गाडी घेण्यासाठी सासरच्यांनी अजून पैशांची मागणे सुरूच ठेवली होती. असे दीप्तीची आई हेमलता मगर यांनी तक्रारीत म्हटले आहे. २०१९ मध्ये दीप्तीचे लग्न मोठ्या थाटात घरच्यांनी करून दिले. शाही पद्धतीने झालेल्या लग्न सोहळ्यात माहेरच्या लोकांनी लग्नात ५० तोळे सोने, लग्नानंतर मुलीचा संसार टिकावा म्हणून ३५ लाख रोख रक्कमही दिली होती.

## पुण्यात आयटी कर्मचाऱ्यांनी चिमुकल्याला मृत्यूच्या दारातून परत आणलं, अनर्थ टळला

**पुणे । प्रतिनिधी**

शहर परिसरामध्ये गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर अपघातांचे प्रमाण वाढल्याचं चित्र दिसून येत आहे, अशातच हिंजवडी आयटी पार्कमध्ये काल (सोमवारी, २६ जानेवारी) प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला (कळपक्षशुरवळ ठेरव -ललळवशपीं) माणुसकीचं दर्शन दिसून आलं, परिसरात एक हृदयद्रावक (कळपक्षशुरवळ ठेरव -ललळवशपीं) घटना घडली त्याची चर्चा सध्या सर्वत्र सुरू आहे. आपल्या कुटूंबासह रस्त्यावरती फुगे आणि छोटे मोठे साहित्य विकून पोट भरणाऱ्या एका १४ वर्षाच्या मुलाला भरधाव ट्रकने चिरडल्याची संतापजनक घटना घडली आहे. मात्र, त्याच वेळी परिसरातून जात असलेल्या आयटी कर्मचाऱ्यांची तत्परता आणि प्रशासनाच्या समन्वय



यामुळे या मुलाला मृत्यूच्या दाढेतून सुखरूप बाहेर काढण्यात आले.

रविवारी सकाळी सुमारे दहा वाजता हिंजवडी परिसरात जड वाहनांना प्रवेशबंदी असतानाही एका वेगाने धावणाऱ्या ट्रकने फुगे विकणाऱ्या अल्पवयीन मुलाला जोरदार धडक दिली. या अपघातात मुलाच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होत होता. घटनेनंतर तेथून जाणाऱ्या आयटी (कळपक्षशुरवळ ठेरव -ललळवशपीं) कंपनीतील कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान दाखवत तातडीने मुलाला आपल्या वाहनातून पिरंगुट येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र, तेथे उपचार नाकारण्यात आले. त्यानंतर सूस परिसरातील रुग्णालयातही जागा उपलब्ध नसल्याने उपचार मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या. अखेर दुपारी साडेएक वाजण्याच्या सुमारास मुलाला पुण्यातील संचेती रुग्णालयात दाखल करण्यात आले. आर्थिक अडचणीमुळे उपचारात विलंब होण्याची शक्यता असताना, फोरम फॉर आयटी एम्प्लॉईज (ऋखढए) या संघटनेने पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांच्याशी संपर्क साधला. डॉ. म्हसे यांनी तातडीने संचेती रुग्णालयाचे डॉ. पराग संचेती यांच्याशी चर्चा केली. परदेशात असतानाही डॉ. संचेती यांनी तत्काळ उपचारांचे निर्देश दिले. त्यानंतर मुलावर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली.(कळपक्षशुरवळ ठेरव -ललळवशपीं)


दरम्यान, या घटनेची गंभीर दखल घेत हिंजवडी पोलिसांनी संबंधित ट्रक चालकाला ताब्यात घेतले आहे. जड वाहनांवर बंदी असतानाही आयटी पार्क परिसरात वाहन नेल्याप्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या प्रसंगी आयटी कर्मचारी आशुतोष पांडे, प्रशांत पंडित आणि पवनजीत माने यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे मुलाचा जीव वाचला असून सर्व स्तरातून त्यांचे कौतुक केले जात आहे.

## पुण्यात आईने चिमुकल्याला गळा चिरुन संपवलं, शेजाऱ्यांनी घरात पाऊल ठेवताच रक्ताचा सडा दिसला, भयानक दृश्य पाहून वाचा बसली

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील वाघोली परिसरातून एक अत्यंत धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. एका आईने स्वतःच्या ११ वर्षांच्या चिमुकल्या मुलाचा चाकूने गळा चिरून खून (चींवशी पशुी) केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेत मृत मुलाचे नाव साईराज संतोष जायभाय असून आरोपी आईचे नाव सोनी संतोष जायभाय आहे.

मुलाचा खून केल्यानंतर आरोपी महिलेने १३ वर्षांच्या मुलीवरही हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रसंगावधान राखत मुलगी घराबाहेर पळाली आणि आरडाओरडा केला. मुलीचा आवाज ऐकताच शेजारी मदतीसाठी धावून आले. शेजाऱ्यांनी घरात प्रवेश केल्यानंतर त्यांनी पाहिलेलं दृश्य अंगावर काटा आणणारं होते. आईनेच आपल्या मुलाचा चाकूने गळा चिरून निर्घृणपणे



खून केल्याचं स्पष्ट झालं. या घटनेची माहिती तातडीने पोलिसांना देण्यात आली. माहिती मिळताच पोलिसांची टीम घटनास्थळी दाखल झाली आणि आरोपी महिलेला ताब्यात घेतलं. घटनेनंतर परिसरात तणावाचं वातावरण पसरलं आहे.पोलिसांनी आजूबाजूच्या नागरिकांची आणि नातेवाइकांची चौकशी केली असता, कौटुंबिक वादातून हा प्रकार घडला असावा, अशी प्राथमिक शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मात्र नेमकं कारण काय, याचा सखोल तपास पोलीस करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी महिला सोनी जायभाय ही एका खाजगी मॉलमध्ये कामाला होती. काही दिवसांपूर्वीच तिने नोकरी सोडल्याची माहिती आहे. तिचा पती संतोष जायभाय हा मिळेल ते काम करतो. घटनेच्या दिवशी सकाळी तो कामानिमित्त घराबाहेर गेला असताना, घरातच हा संपूर्ण प्रकार घडल्याचं समोर आलं आहे. सध्या पोलिसांकडून संबंधित महिलेची चौकशी सुरु असून त्यामधून आणखी कोणती माहिती समोर येणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

## केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते 'पोलीस मित्र संघटना २०२६' दिनदर्शिकेचे प्रकाशन




**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पोलीस मित्र संघटनेच्या सन २०२६ च्या नवीन दिनदर्शिकेचे मोठ्या उत्साहात प्रकाशन करण्यात आले. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते हा समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमाला आमदार हेमंत रासने, पोलीस मित्र संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र कपोते, अतुल पाटील, मनीष सोनिगरा, रणजित कलापुरे, सुरज कपोते यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. दिनदर्शिकेचे प्रकाशन केल्यानंतर मुरलीधर मोहोळ यांनी संघटनेच्या कामाचा गौरव केला. पोलीस आणि जनता यांच्यातील दुवा म्हणून पोलीस मित्र संघटना मोलाचे कार्य करत आहे. समाजातील शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी अशा संघटनांचे सहकार्य कौतुकास्पद आहे, अशा शब्दांत त्यांनी संघटनेचे कौतुक केले.

## पैशांचा व्यवहार जीवावर बेतला; सिंहगड रोडच्या तरुणाची मित्रांनीच केली हत्या

**पुणे । प्रतिनिधी**

पैशांच्या देवाणघेवाणीच्या वादातून मित्रानेच साथीदारांच्या मदतीने मित्राचा निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने अवघ्या १२ तासांच्या आत खुनातील आरोपींना अटक केली. शुभम राजेश शिंदे (२५, रा. सिंहगड रोड, नांदेड सिटी, पुणे), लकी सुरेंद्र सिंग (२३, रा. खडकी म्युनेशन फॅक्टरी, पुणे) ,

सुनील संतोष खलसे ऊर्फ एस.के. (१९, रा. संभानगर झोपडपट्टी, कर्वेनगर, पुणे) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. एक विधीसंघर्षित बालकाचाही या गुन्ह्यात सहभाग असल्याचे उघड झाले आहे.वारजे माळवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक बेवारस मृतदेह सापडला होता. वारजे पोलिसांसोबत गुन्हे शाखा एककडून समांतर तपास सुरू होता. पोलीस अंमलदार बाळू गायकवाड व साई कारके यांना खबर मिळाली की, वारजे परिसरात गणपती माथा ते शिंदे पूल येथे दोघे जण संशयास्पदरीत्या उभे आहेत. तत्काळ पथक तेथे गेले असता, पोलिसांची चाहुल लागताच संशयितांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र पाठलाग करून त्यांना ताब्यात घेण्यात आले.अधिक चौकशीत आरोपींनी कबूल केले की, त्यांनी राजेंद्र सुभाष ऐलगच्चे (रा. स्वराज आर्केड, आंबेगाव, पुणे) याला बुधवारी रात्री आकाशनगर शनि मंदिर टेकडी येथे पैसे देण्याच्या कारणावरून बोलावून घेतले होते. त्यानंतर लोखंडी हत्याराने गळा, छाती, पोट, पायावर वार करीत तसेच डोक्यात दगड घालून त्याचा निर्घृण खून केला.